महेंद्र पेडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
स्पेशल आमरस 400/- किलो
कापड बाजार, अहिल्यानगर.

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०५.०५.२०२६ | अंक नं. ०२९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South |
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध.
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



स्व. प्रफुल्ला नरेंद्र पंड्या
(माजी उपनगराध्यक्षा)
स्व.दि. ५/५/२००९

## १७ वे पुण्यस्मरण

आठवणींचा हा अथांग सागर.. उसळतो नेहमी क्षणोक्षणी...
प्रसन्न उत्साहाची मूर्ती तुझी.. सदैव उभी राहते मनोमनी...

तुझे संस्कार व शिकवण आम्हाला
सैदव बळ देत राहील...
आई, तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

मुंजोबा स्वीट्स

**पंकज नरेंद्र पंड्या**
**व पंड्या परिवार**
मार्केट यार्ड चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर.
फोन : ०२४१ - २३४६८४८

फ्लेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323

## भावपूर्ण श्रद्धांजली



**स्व. गुलशन चाननलाल जग्गी**
भारतीय जनता पक्षाचे प्रथम अध्यक्ष
( दु:खद निधन : ०५/०५/२०२६ )

अस्ताला गेला सूर्य जरी, प्रकाश मागे सोडून गेला..
मार्गदर्शक हरपला आमचा, विचारांचा वारसा देऊन गेला

-: शोकाकुल :-

वसंत लोढा । ॲड. अभय आगरकर । सुनील रामदासी । सदा देवगावकर । दामोदर बठेजा । प्रा. भानुदास बेरड। मिलिंद गंधे । गौतम दीक्षित । सचिन पारखी । चेतन जग्गी। प्रशांत मुथा । पंडित वाघमारे । संतोष गांधी । नरेंद्र कुलकर्णी । साहेबराव विधाते ।

अंत्यसंस्कार नालेगाव, अमरधाम सायं ५.३० वाजता

सस्नेह निमंत्रण
प्रज्ञा । शील ।। करुणा ।।
सविनय जय भीम आमचे येथे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान बुध्द कृपेने
तानाजीभाऊ जाधव
अध्यक्ष : टायगर ग्रुप, महाराष्ट्र राज्य
संजयभाऊ खंडागळे
अध्यक्ष : टायगर ग्रुप, मुंबई
ऐतिहासिक अहिल्यानगर शहरात आपले सहर्ष स्वागत..



तानाजीभाऊ जाधव
अध्यक्ष : टायगर ग्रुप, महाराष्ट्र राज्य
संजयभाऊ खंडागळे
अध्यक्ष : टायगर ग्रुप, मुंबई

आयु. अतुल
बुध्दवासी टिलू नानाजी भिंगारदिवे यांचे नातू व बुध्दवासी नंदू टिलू भिंगारदिवे रा. केडगाव, अहिल्यानगर यांचे कनिष्ठ चिरंजीव

आयुष्मती अनुष्का
आयु. पोपट शंकर जाधव यांची नात व आयु. सुनिल पोपट जाधव रा. पळवे गाव, पुणे यांची ज्येष्ठ कन्या

मंगल परिणय
बुधवार दि. ६/५/२०२६ रोजी, सायं. ५.३० वा. करण्याचे योजिले आहे. आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे



परिणय स्थळ : खुशी लॉन्स, दुधसागर, मेहेराबाद रोड, केडगाव, अहिल्यानगर
निमंत्रक
आयु. सागरभाऊ भिंगारदिवे
मो. 9552497777
समस्त भिंगारदिवे परिवार

मा.श्री. सागरभाऊ भिंगारदिवे (उद्योजक) मो. 9552497777
हिच निमंत्रण पत्रिका समजून आपल्या उपस्थितीने विवाह सोहळ्याची शोभा वाढवावी ही मनापासून विनंती..
मा.श्री. बंटीभाऊ भिंगारदिवे (जिल्हाध्यक्ष टायगर ग्रुप) मो. 9807182222



वडिलांचा आशीर्वाद, आईचे स्वप्न, मित्रांची मेहनत आणि मतदारांचे प्रेम यांचा सुरेख संगम..
मा.श्री. अक्षयदादा कर्डिले
यांची राहुरी मतदार संघातुन आमदार पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे
हार्दिक अभिनंदन



* शुभेच्छुक *
सागर भगत
ईसाक शेख
जगदंब डेव्हलपर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर
मुथ्था चेंबर, माळीवाडा, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने तोफखाना पोलिसांचे पायी संचलन, टवाळखोरांसह बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाईची मोहीम

नगर – नगरमध्ये नव्याने रुजू झालेले जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेल्या विशेष सूचना आणि आदेशानुसार, तोफखाना पोलीस ठाण्याच्या वतीने शहरात पायी संचलन (पेट्रोलिंग) करण्यात आले. पोलिसांचा मोठा ताफा अचानक रस्त्यावर उतरल्याने बेशिस्त वाहनचालक आणि टवाळखोरांची मोठी धावपळ उडाली. या धडक मोहिमेमुळे गुन्हेगारांवर जरब बसली असून नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

शहरातील मुख्य वर्दळीचे भाग असलेल्या कोठला, कोंडे मामा चौक, सर्जेपुरा चौक आणि दिल्ली गेट यांसारख्या संवेदनशील ठिकाणी पोलिसांनी पायी गस्त घातली. यावेळी रस्त्यावर विनाकारण फिरणारे आणि नियमांचे उल्लंघन करणारे पोलिसांच्या रडारवर होते. या कारवाईत पोलिसांनी प्रामुख्याने दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करणारे, तसेच वाहनांवर विचित्र (फॅन्सी) नंबर प्लेट लावणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली. ज्या गाड्यांना नंबर प्लेट नव्हती, त्यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात आली.


पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार शहरात पायी संचलनकरत बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करताना तोफखाना पोलिसांचे पथक.

तसेच, ज्या चारचाकी वाहनांच्या काचांना काळे आच्छादन (फिल्म) लावण्यात आले होते, अशा सर्व गाड्या थांबवून पोलिसांनी जागीच त्या काचांवरील फिल्म काढून टाकल्या. रस्त्याला अडथळा ठरणारे हातगाडे आणि अनधिकृत अतिक्रमणांवरही तोफखाना पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. या कारवाईमुळे रस्त्यावरील टवाळखोर आणि 'रोड रोमिओ' यांच्यावर अंकुश बसण्यास मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांनी तातडीने आपल्या वाहनांवरील फॅन्सी नंबर प्लेट बदलून घ्याव्यात, असे आवाहन तोफखाना पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नगर-कल्याण रोडवर वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

नगर – नगर कल्याण रोडवर भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने पायी चाललेल्या तरुणाला धडक दिली. या अपघातात शिवकुमार अंगनलाल यादव (वय ३०, रा.शिवाजीनगर, कल्याणरोड) यांचा मृत्यू झाला असून, धडक देऊन चालक वाहनसह पसार झाला आहे.

याप्रकरणी मयताचा भाऊ दीपककुमार अंगनलाल यादव यांनी ४ मे रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, २ मे रोजी रात्री ८.३० च्या सुमारास त्यांचे भाऊ शिवकुमार हे बाजार करून रस्त्याने पायी घराकडे जात होते. यावेळी एका अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने चालवून शिवकुमार यांना पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्यामुळे शिवकुमार यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर अज्ञात चालक मदतीसाठी न थांबता घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी हे करत आहेत.

## कोठला परिसरात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

नगर –शहरातील कोठला परिसरात राजचेंबर समोर भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एकनाथ काशीनाथ चव्हाण (रा.वडांगळे वस्ती, कोपरगाव)यांचा मृत्यू झाला असून, धडक देऊन चालक वाहनसह पसार झाला आहे.

याप्रकरणी राजू काशीनाथ चव्हाण यांनी ४ मे रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, २९ एप्रिल रोजी सायंकाळी सव्वा पाच वाजेच्या सुमारास त्यांचे भाऊ एकनाथ चव्हाण हे आपल्या दुचाकीवरून (क्र.एमएच १७ बीटी ३४२०) जात होते. यावेळी एका अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने चालवून एकनाथ यांच्या दुचाकीला पाठीमागून भीषण धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झाल्यामुळे एकनाथ चव्हाण यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर अज्ञात चालक मदतीसाठी न थांबता घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून या घटनेचा तपास सहायक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव करत आहेत.

## द्रौपदाबाई जगताप यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – विनायकनगर येथील रहिवासी द्रौपदाबाई गणपतराव जगताप (वय ९०) यांचे ५ मे रोजी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात २ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. द्रौपदाबाई या संदीप व सचिन जगताप यांच्या मातोश्री तर आमदार संग्राम जगताप व नगरसेवक विकी जगताप यांच्या चुलती होत.

# पुढच्या आठवड्यात पारा जाणार ४५ अंशांवर, उन्हाचा तडाखा वाढणार; सूर्याचे उत्तरायण सुरू

### कोपरगाव, संगमनेरात सावली होणार गायब

नगर – गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने घट होत होती. मात्र, आता उन्हाचा तडाखा पुन्हा वाढणार आहे. कारण सूर्याचे उत्तरायण सुरू झाले असून ३१ मे पर्यंत सूर्य महाराष्ट्राच्या बरोबर डोक्यावर असणार आहे. यामुळे अहिल्यानगरमध्ये पुढील काही दिवसांत तापमानाचा पारा विक्रमी ४५ अंश सेल्सिअसच्या वर पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पुढील काही दिवसात तापमान सातत्याने वाढत जाणार आहे. १८ व १९ मे रोजी सूर्य अहिल्यानगरच्या बरोबर डोक्यावर येईल. त्या दिवशी शून्य सावली अनुभवता येणार आहे. पण त्याचवेळी तापमानात प्रचंड वाढ झालेली असेल. त्यामुळे हिटस्ट्रोकची शक्यताही वाढणार आहे. त्यामुळे पुढील १० दिवस कोणीही दुपारच्या वेळात उन्हात जावू नये, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

हवामान अंदाजानुसार, चालू आठवड्यात तापमान ३७ ते ३९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. मात्र, १० मे नंतर उष्णतेची लाट अधिक तीव्र होणार आहे. ५ मे ते ७ मे दरम्यान तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील, आकाश मुख्यतः निरभ्र असेल. ८ ते १० मे या कालावधीत तापमानाचा पारा ३९ ते ४० अंशापर्यंत वाढेल. ११ मे रोजी तापमानात मोठी वाढ होऊन ते ४४ अंशावर पोहोचेल. १२ मे हा दिवस सर्वाधिक उष्ण असेल, तापमान ४५ अंशावर जाण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. १४ मे रोजी दुपारच्या वेळी पावसाच्या हलक्या सरींची शक्यता असली, तरी उष्णता कायम असेल, असे सांगण्यात आले.

सूर्याचे उत्तरायण सुरु झाल्यामुळे महाराष्ट्रात सूर्यकिरणे लंबरेषेत पडणार असून, यामुळे राज्यात ठिकठिकाणी झिरो शॅडो म्हणजेच शून्य सावलीचा अनुभव घेता येणार आहे. उत्तर अक्षांश स्थितीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव, संगमनेर भागात शून्य सावली अनुभवता येणार आहे. यानुसार १८ मे रोजी संगमनेर, १९ मे रोजी कोपरगाव येथे सूर्य बरोबर डोक्यावर आल्यामुळे शून्य सावलीचा अनुभव येवून सावली गायब झाल्याचे दिसून येणार आहे.

### हीटस्ट्रोकपासून स्वत:चे बचाव करण्याचा आवाहन

सूर्याचे उत्तरायण सुरू झाल्याने दुपारच्या वेळी सूर्य बरोबर डोक्यावर येतो, ज्यामुळे सावली गायब होते. मात्र, याच काळात उन्हाचे चटके अधिक तीव्र होतात. विदर्भात पारा ४६ अंशांच्या पार जाण्याची भीती व्यक्त होत असताना, अहिल्यानगरमध्येही ४५ अंशांपर्यंत तापमान जाणार असल्याने नागरिकांनी दुपारच्या वेळी बाहेर पडणे टाळावे आणि जास्तीत जास्त पाणी पिऊन स्वतःला हायड्रेटेड ठेवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# दुकानदारांनी रस्त्यावर साहित्य लावून वाहतुकीस अडथळा केल्यास कारवाई; वाहतूक शाखेची मोहिम

नगर – शहरातील बाजारपेठेत दुकानदारांनी रस्त्यावर साहित्य लावून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या दुकानदारांवर वाहतूक शाखेकडून थेट कारवाईची मोहिम हाती घेण्यात आली आहे. ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजेपासून रात्री ७ वाजेपर्यंत वाहतूक शाखेकडून ही कारवाईची मोहिम राबविण्यात आली.


अतिक्रमण करून वाहतुकीला अडथळा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर शहर वाहतूक शाखेच्या वतीने दंडात्मक कारवाई करण्यात आली. (छायाचित्र : धनेश कटारिया)

शहर वाहतूक शाखेचे निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी ४ मे रोजी सायंकाळी बाजारपेठ परिसरात धडक मोहीम राबवून अतिक्रमणधारकांना कडक कारवाईचा इशारा दिला आहे. नगर शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये दुकानदारांनी रस्त्यापर्यंत आपले साहित्य लावून अतिक्रमण केल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. यामुळे वाहनचालक आणि पादचारी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर, सोमवारी सायंकाळी वाहतूक शाखेने डाळमंडई, गंजबाजार, सराफ बाजार आणि मोची गल्ली या गजबजलेल्या परिसरामध्ये विशेष कारवाई मोहीम राबवली.

या मोहिमेदरम्यान रस्त्यावर अतिक्रमण करणारे व्यावसायिक आणि बेशिस्त वाहन पार्किंग करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. निरीक्षक बोरसे यांनी दुकानदारांना सक्त ताकीद दिली की, पुन्हा रस्त्यावर साहित्य लावून रहदारीला अडथळा निर्माण केल्यास अधिक तीव्र कारवाई करण्यात येईल. शहराची वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी व्यापाऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### महापालिका कारवाईपासून अलिप्त

शहरातील रस्त्यांवर अतिक्रमण वाढू नये, असे अतिक्रमण केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेचा स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. शहरात अनेकदा वाहतूक शाखा व महापालिकेचा अतिक्रमण विभाग यांच्याकडून संयुक्त कारवाई मोहिम राबविण्यात येते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून महापालिकेचा अतिक्रमण विभाग एकदम शहरातील कारवायांपासून अलिप्त झालेला दिसत आहे. शहरातील अतिक्रमणांवर कारवाई करण्यापासून महापालिकेच्या पथकाला कोणी अडविले, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

### भारतीय जनता पार्टीचे पहिले शहराध्यक्ष

## गुलशन जग्गी यांचे अल्प आजाराने निधन

नगर – प्रोफेसर कॉलनी चौकातील रहिवासी भारतीय जनता पार्टीचे नगर शहराचे पहिले संस्थापक अध्यक्ष गुलशन जग्गी (वय ८०) यांचे ५ मे रोजी पुणे येथे खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना व नातवंड असा परिवार आहे. डॉ. नितीन, राहुल, नवीन जग्गी यांचे वडील, भारतीय जनता पार्टीचे शहर सचिव पियूश जग्गी यांचे ते चुलते होत.

नगर शहरात जनसंघापासून सक्रिय काम करत भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेनंतर १९८० ते ८५ या काळात गुलशन जग्गी हे नगर शहराचे पहिले अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले होते. प्रतिकूल परिस्थितीत नगर शहरात पार्टीचे विचार रुजवून काम वाढवण्यात जग्गी यांनी योगदान दिले. त्या काळात आक्रमक भूमिका घेत गुलशन जग्गी यांनी अनेक आंदोलने गाजवली. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन यांच्यासारख्या नेत्यांशी जग्गी यांचा संपर्क असायचा. त्याकाळात गोपीनाथ मुंडे व प्रमोद महाजन यांच्याबरोबर अनेकदा त्यांनी एसटी व दुचाकीवर प्रवास करून पक्षाचे काम वाढवले.

गुलशन जग्गी हे बालपणी फाळणीच्या वेळेस कुटुंबा समवेत भारतात आले व नगरमध्ये स्थायिक झाले. तेलीखुंट येथील सायकल दुकानाचा व्यवसाय सांभाळून त्यांनी पार्टीचे प्रमाणिकपणे व नि:स्वार्थपणे काम करून वाढवले. दोन वेळा नगरसेवकपद भूषवणारे गुलशन जग्गी यांनी शहर सरकारी बँकेचे संचालक म्हणूनही काम केले होते.

## नंदलाल शेटीया यांचे अल्प आजाराने निधन

नगर – 'नंदादीप', अरिहंत कॉलनी, सीताबन लॉन समोर, पूनम मोतीनगर येथील रहिवासी, मार्केटयार्ड येथील 'नंदलाल चंपालाल शेटीया' किराणा दुकानाचे संचालक नंदलाल सुखलाल शेटीया (वय ६७) यांचे ५ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हर्षद व निखील शेटीया (हनुमान भक्त) यांचे ते वडील होत.

## सुमन उपाध्ये यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील श्रीमती सुमन नारायण उपाध्ये (वय ७६) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात तीन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्वर्गीय नारायण रामचंद्र उपाध्ये यांच्या त्या पत्नी, नक्षत्र डान्स अकॅडमीचे राहूल उपाध्ये व चेतन उपाध्ये यांच्या चुलती होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# खा.निलेश लंके यांच्या विरोधात व्हिडिओ पोस्ट केल्याच्या रागातून तरुणाचे अपहरण करत केली अमानुष मारहाण

नगर – सोशल मीडियावर खासदार निलेश लंके यांच्या विरोधात व्हिडिओ पोस्ट केल्याच्या रागातून एका तरुणाचे पुण्यातील खराडी भागातून अपहरण करून त्याला नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथे डांबून ठेवत अमानुषपणे मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बीड जिल्ह्यातील आष्टी येथील रहिवासी किशोर महादेव परभणे (वय २८) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीने खासदार निलेश लंके यांच्याबाबत सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट केला होता. याचाच राग मनात धरून आरोपी प्रणव विजय मोरे (रा. आठवड, ता.नगर), शरद खंडू पवार, मारुती देवराम कोकाटे (दोघे रा. चिचोंडी पाटील, ता.नगर), रॉबीन सिंग आणि एका अनोळखी व्यक्तीने फिर्यादीचे ७ फेब्रुवारी रोजी रात्री ११ सुमारास पुण्याच्या खराडी येथून पांढऱ्या रंगाच्या स्वीफ्ट कारमधून अपहरण केले.

आरोपींनी किशोर यांना चिचोंडी पाटील येथील हरिओम हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या एका खोलीत डांबून ठेवले. तिथे त्यांचे कपडे काढून, हात-पाय बांधून लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण करण्यात आली. आरोपींनी पीडित तरुणाला जबरदस्तीने संडास साफ करायला लावून अमानुषपणे लघवी पाजल्याचा खळबळजनक आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच या अमानवीय कृत्याचा व्हिडिओ बनवून त्यांना धमकावण्यात आले. या घटनेनंतर आरोपींनी फिर्यादीला बीड जिल्ह्यातील अंभोरा पोलीस ठाण्यात नेऊन त्यांच्या मर्जीविरोधात काही कागदपत्रांवर लिहून घेतले. फिर्यादी घाबरलेले असल्याने त्यांना एका महिलेने संरक्षण दिल्यानंतर त्यांनी ४ मे रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक उमेश पतंगे हे करत आहेत.

# गोमांस वाहतूक करणारे वाहन गोरक्षकांच्या मदतीने पकडले, दीड लाखांचे गोमांस जप्त, बायपास रस्त्यावर पोलिसांची कारवाई

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस वाहतूक करणारी शेवरोलेट कंपनीची इंजॉय गाडी (क्र.एम एच ४६ एक्स ४०५४) गोराक्षकांनी पाठलाग करून पकडत नगर तालुका पोलिसांच्या ताब्यात दिली आहे. पोलिसांनी या गाडी सह तब्बल दीड लाख रुपये किंमतीचे गोमांस जप्त केले आहे. बायपास रोड वर सारोळा बद्धी शिवारात नारायणडोह कडे जाणाऱ्या रोडवर ४ मे रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

काही गोरक्षक बायपास रोडवर गस्त घालत गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्यांचा शोध घेत होते. त्यांना एक राखाडी रंगाची शेवरोलेट कंपनीची इंजॉय गाडी संशयास्पद रित्या जाताना दिसली. या गोराक्षकांनी ती गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला असता गाडी चालकाने ती भरधाव वेगात पळविली. गोराक्षकांनी नगर तालुका पोलिसांना माहिती देत त्या गाडीचा बायपास रस्त्याने पाठलाग सुरु केला.

सारोळा बद्धी शिवारात नारायणडोह कडे जाणाऱ्या रोडवर गाडी चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ती रस्त्याच्या खाली जावून उलटली. गोरक्षक आणि पोलिसांच्या पथकाने गाडी जवळ जावून पाहणी केली असता ती मध्ये गोमांस आढळून आले. पोलिसांनी गाडी व चालक इरफान इक्बाल शेख (वय २६, रा. दरोडी, ता.पारनेर) यास ताब्यात घेतले. त्याच्या विरुद्ध पो. हे.कॉ.शैलेंद्र सरोदे यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पो. ना. मोहिनी कर्डक या करत आहेत.

## एकाच दिवसात ९ बालविवाह थांबविण्यात यश

नगर – महिला व बालविकास विभागाच्या सतर्कतेमुळे जिल्ह्यात एका दिवसात एकूण ९ बालविवाह थांबविण्यात प्रशासनाला यश मिळाले आहे. या कारवाईमुळे बालविवाह प्रतिबंधाबाबत प्रशासनाची सजगता अधोरेखित झाली आहे. ३ मे रोजी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात आली. या कारवाईत नगर शहरात ३, अकोल्यात १, राहुरीत १, श्रीगोंद्यात १, पाथर्डीत १, नेवाशात १ आणि नगर तालुक्यात १ असे एकूण ९ बालविवाह थांबविण्यात आले.

या मोहिमेत पोलीस यंत्रणा, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, जिल्हा बालसंरक्षण कक्ष तसेच चाइल्ड हेल्पलाइन कक्ष यांचा सक्रिय सहभाग राहिला.

सर्व यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधून ही कारवाई करण्यात आली. नागरिकांनीही अशा घटनांची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी व सहकार्य करावे.

## तलवार बाळगणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नगर – भुईकोट किल्ल्याजवळ लोखंडी तलवार घेऊन फिरणाऱ्या एका तरुणाला भिंगार कॅम्प पोलिसांनी सापळा रचून रंगेहाथ पकडले आहे. उदय अब्राहम ढगे (वय २२, रा. शांतीनगर, केदारवस्ती) असे पकडलेल्या तरुणाचे नाव असून त्याच्याकडून तलवार जप्त करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना ४ मे २०२६ रोजी गोपनीय माहिती मिळाली की, एक तरुण तलवार घेऊन येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ तपास पथकाला रवाना केले. पोलिसांनी सापळा लावला असतानाच उदय अब्राहम ढगे (वय २२, रा. शांतीनगर, केदारवस्ती) हा तरुण हातात धारदार तलवार घेऊन येताना दिसला. पोलिसांची चाहूल लागताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पथकाने त्यास जागीच पकडले.

तपास पथकाने पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्याकडे लोखंडी तलवार मिळून आली. शस्त्राबाबत विचारपूस केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही. याप्रकरणी पोलिसांनी उदय ढगे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# कापड बाजारात चुकलेल्या बालकाला पोलिसांनी दिले पालकांच्या ताब्यात

नगर – जिल्ह्याचे नवीन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार शहरात पायी गस्त सुरू असताना, कोतवाली पोलिसांनी कापड बाजारात चुकलेल्या एका सात वर्षीय बालकाला सुखरूप त्याच्या पालकांच्या स्वाधीन केले.



शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या आदेशानुसार पोलीस पथक ४ मे रोजी सायंकाळी कापड बाजार परिसरात पायी पेट्रोलिंग करत होते. यावेळी त्यांना एक सात वर्षांचा लहान मुलगा घाबरलेल्या अवस्थेत मिळून आला. पोलिसांनी मायेने विचारपूस केली असता, त्या मुलाला स्वतःचे नाव किंवा पत्ता सांगता येत नव्हता. बालक बोलू शकत नसल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते.

पो.नि. संभाजी गायकवाड यांनी तात्काळ पावले उचलत सोशल मीडियाचा आधार घेण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांनी तातडीने व्हॉट्सप आणि इतर माध्यमांतून मुलाचे छायाचित्र प्रसारित केले. तब्बल पाच तासांच्या अथक परिश्रमानंतर हा मुलगा श्रीरामपूर येथील रामगड भागातील असल्याचे समजले. हमजा अजीम सय्यद असे या मुलाचे नाव असून तो कापड बाजारात गर्दीत चुकला होता.

यानंतर पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. खात्री पटल्यानंतर मुलाला नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. हरवलेला मुलगा सुखरूप परत मिळाल्याने नातेवाईकांनी पोलिसांचे आभार मानले. या कामगिरीत पोलीस हवालदार विजय ठोंबरे, भानुदास सोनवणे, दीपक रोहकले, आणि सुनिल शिरसाट यांनी मोलाची भूमिका बजावली.

# गृहिणी

## आरोग्य

### आता घरीच भाजा चणे...

तुम्ही देखील बाजारातून भाजलेले चणे विकत घेता का? पण गरम चण्यांची चव वेगळी असते. तुम्ही घरी भाजून ताजे आणि कुरकुरीत चणे नक्कीच खाऊ शकता. तर चला घरीच चणे भाजण्याची ही सोपी पद्धत जाणून घ्या.चणे भाजण्यासाठी दोन कप मीठ आणि एक वाटी सुके काळे चणे घ्या. गॅस चालू करा आणि एक जाड तळाचा तवा ठेवा आणि मीठ गरम होऊ द्या. आता मिठामध्ये मूठभर चणे घाला. गॅस मोठा ठेवा आणि सतत ढवळत राहा. एका मिनिटातच, सर्व चणे फुलू लागतील. मोठ्या, व छिद्र असलेल्या झाऱ्याने ते चाळून घ्या. आता मीठ पॅनमध्ये राहील, आणि चणे काढून टाका आणि प्लेटमध्ये ठेवा. त्याचप्रमाणे, मीठात आणखी एक मूठभर चणे घाला आणि सतत ढवळत राहा. सर्व चणे अशा प्रकारे भाजून घ्या. अश्या प्रकारे तुम्ही घरी चणे भाजून घेऊ शकता आणि तुम्हाला हवे तेव्हा खाऊ शकता. तुम्हाला मीठ घालण्याचीही गरज नाही. तुम्ही हे मीठ कुठेतरी साठवून ठेवू शकता आणि तुम्हाला हवे तेव्हा चणे पुन्हा भाजून घेऊ शकता.

## पाककला

### सुंठाचे लाडू

**साहित्य :** दोन कप गव्हाचे पीठ, दोन चमचे सुंठ पावडर, एक कप गूळ, एक कप तूप, दहा बदाम, दहा काजू, एक टेबलस्पून मनुका, अर्धा चमचा वेलची पूड

**कृती :** सर्वात आधी एका पॅनमध्ये तूप गरम करा. त्यात गव्हाचे पीठ घाला आणि मंद आचेवर सोनेरी तपकिरी होईपर्यंत भाजून घ्या. पीठाला सुगंध येऊ लागला की, गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. दुसऱ्या पॅनमध्ये थोडे तूप घाला आणि किसलेला गूळ घाला. मध्यम आचेवर ते वितळू द्या. गूळ जळणार नाही याची काळजी घ्या. आता भाजलेल्या पिठामध्ये सुक्या आल्याची पूड, वेलची पूड, बदाम, काजू आणि मनुके घाला आणि चांगले मिक्स करा. आता वितळलेला गूळ घाला आणि चांगले मिक्स करा. मिश्रण थोडे गरम झाल्यावर, हाताने गोल लाडू बनवा आणि प्लेटमध्ये ठेवा. लाडू थंड झाल्यावर, ते हवाबंद डब्यात ठेवा व हिवाळ्यात रोज एक लाडू सेवन करा.

## वास्तू

### असे वापरावे घड्याळ

तुम्ही घड्याळ कसे घालता याचा तुमच्या प्रगतीवर आणि नशिबावर परिणाम होतो. उजव्या हातात धातूची साखळी आणि सोन्याचे किंवा चांदीचे घड्याळ घालणे शुभ मानले जाते. तुटलेले किंवा बंद घड्याळ घालणे नकारात्मक ऊर्जा आणते. असे मानले जाते की उजव्या हातात घड्याळ घातल्याने कामाला गती मिळते आणि जीवनात यश मिळते. घड्याळे केवळ फॅशनसाठीच नव्हे तर वास्तु दृष्टिकोनातून देखील घालावीत. योग्य रंग, उजवा हात आणि योग्य डिझाइन तुमच्या आयुष्यात आनंद आणि यश दोन्ही आणू शकते.

## सौंदर्य

केस धुण्यासाठी जास्वंद देखील वापरता येते. यासाठी प्रथम जास्वंदाचा चहा बनवा आणि नंतर थंड होऊ द्या. आता शॅम्पूच्या मदतीने केस स्वच्छ करा. यानंतर, तयार चहाच्या मदतीने केस स्वच्छ धुवा. जास्वंदा समधील नैसर्गिक ॲसिडस् तुमच्या टाळू आणि केसांचा संतुलित करण्यास मदत करतात, ज्यामुळे ते अधिक मऊ होतात.

## सल्ला

चहा गाळणीच्या जाळीत चहाची पाने अडकली आहेत, तर ती घासू नका. यामुळे ती आणखी अडकतील. याऐवजी गाळणी नळाखाली धुवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ६ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, मूळ १५।५४, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कन्या :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.


**धनु :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**मकर :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**मीन :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

# शब्दगंध क्र. ७४२३ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) भडकलेला अग्नी ३) दक्षिण भारतातील एक थंड हवेचे ठिकाण ७) पुरुषाचे एक वस्त्र; विजार; तुमान ८) तुकडा; चावा ९) भारतातील एक सर्वात मोठा राजकीय पक्ष (संक्षिप्त नाव) ११) त्वचेवरील काळा डाग; चामखीळ; १३) रममाण; लीन; मग्न; गुंग १४) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास; प्रतिष्ठा १५) पापुद्रा; दर्जा तीळ १६) वाताहत; बोजवारा १७) समाधी; थडगे; मकबरा १९) खडतर व्रत; बारा वर्षांचा काळ २१) राज्यासंबंधीचे प्रश्न किंवा गुप्त मसलत २३) नोकर; चाकर; दास; सेवक २४) जुडगा; झुबका; समूह

**शब्दगंध क्र. ७४२२ चे उत्तर**



**उभे शब्द :-** १) पायापासून डोक्यापर्यंत; नखशिखांत २) दुर्लक्ष; क्षमा ३) भाजपच्या एक नेत्या; मध्यप्रदेशच्या एक माजी मुख्यमंत्री ४) केस काळे करण्याचे रसायन ५) व्यासपीठ; रंगभूमी ६) डाकू; दरोडेखोर १०) काळजीवपूर्वक रक्षण; संगोपन १२) आदरातिथ्य; पाहुणचार १४) ताटापेक्षा थोडे मोठे पसरट पात्र १८) धोबी ; परीट २०) तांबडी फुले येणारा एक वृक्ष ज्याच्या पानांपासून पत्रावळी तयार केल्या जातात २२) राखण; राख; राखी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** अनुभव हा सर्वोत्तम विद्यापीठ आहे, परंतु त्यासाठी मोठी किंमत मोजावी लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### भारतीय चलनी नोटांवर गांधीजींचे चित्र कधी छापण्यात आले?

भारताच्या ओळखीचे, त्याच्या मूल्यांचे आणि त्याच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतीक असलेल्या महात्मा गांधींची हसरी प्रतिमा भारतीय चलनी नोटांवर दररोज आपल्यासमोर येते. ही प्रतिमा इतकी परिचित आहे की ती केव्हा आणि कुठे काढली गेली आणि ती आपल्या राष्ट्रीय अभिमानाचा अविभाज्य भाग कशी बनली याकडे फार कमी लोक लक्ष देतात. हे केवळ एक छायाचित्र नाही तर भारताच्या संघर्षाचे आणि त्याच्या आत्म्याचे प्रतिबिंब असलेल्या एका ऐतिहासिक क्षणाचे दस्तऐवज आहे.

आज भारतीय चलनी नोटांवर दिसणारा महात्मा गांधींचा हा प्रतिष्ठित फोटो प्रत्यक्षात भारत ब्रिटिश राजवटीखाली असताना काढला गेला होता. हा फोटो एप्रिल १९४६ मध्ये काढण्यात आला होता. त्यावेळी महात्मा गांधी ब्रिटिश राजकारणी लॉर्ड फ्रेडरिक विल्यम पेथिक-लॉरेन्स यांना त्यांच्या निवासस्थानी भेटण्यासाठी गेले होते. ही भेट तत्कालीन व्हाइसरॉय हाऊस (आता राष्ट्रपती भवन) येथे झाली होती.

या काळात, एका अज्ञात व्यक्तीने महात्मा गांधींचे हे छायाचित्र काढले. हा फोटो निवडण्यात आला कारण तो गांधीजींच्या हसऱ्या अभिव्यक्तीला उत्तम प्रकारे टिपतो, जो त्यांचा साधेपणा, शांती आणि अहिंसा प्रतिबिंबित करतो. हा व्यंगचित्र किंवा रंगमंच केलेला फोटो नाही, तर एका वास्तविक क्षणाचे चित्रण आहे.

स्वातंत्र्यानंतर, भारतीय नोटांमध्ये सुरुवातीला ब्रिटिश सम्राट, राजा जॉर्ज सहावा यांची प्रतिमा होती. १९४९ मध्ये, भारत सरकारने १ रुपयांच्या नोटेसाठी एक नवीन डिझाइन जारी केले, ज्यामध्ये किंग जॉर्जच्या जागी सारनाथ येथील अशोक स्तंभावरील सिंह राजधानीचे चित्र छापण्यात आले. हे स्वतंत्र भारताच्या नवीन ओळखीचे प्रतीक बनले. महात्मा गांधींचा फोटो पहिल्यांदा १९६९ मध्ये भारतीय चलनावर छापण्यात आला होता. त्यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त जारी केलेली ही एक विशेष नोट होती. या नोटमध्ये सेवाग्राम आश्रमाच्या पार्श्वभूमीवर गांधीजी बसलेले दाखवण्यात आले होते.

तथापि, आजच्या नोटांवर आपल्याला दिसणारा गांधीजींचा परिचित हसरा चेहरा पहिल्यांदा ऑक्टोबर १९८७ मध्ये ५०० रुपयांच्या नोटांच्या मालिकेत दिसला. हा एक महत्त्वाचा बदल होता, कारण गांधीजींची प्रतिमा पूर्वी नोटांवर हास्याशिवाय दिसली होती.

त्यानंतर, १९९६ पासून, भारतीय रिझर्व्ह बँकेने 'महात्मा गांधी मालिके' अंतर्गत सर्व मूल्यांच्या नोटांवर हे प्रतिष्ठित चित्र कायमचे समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. या नोटांमध्ये विंडो सिक्युरिटी थ्रेड, लेटेंट इमेज आणि दृष्टिहीनांसाठी इंटॅग्लिओ फीचर्स अशी अनेक नवीन सुरक्षा वैशिष्ट्ये देखील समाविष्ट केली गेली. तेव्हापासून, ही प्रतिमा भारतीय चलनाचा अविभाज्य आणि कायमचा भाग बनली आहे.

### सोन्याचे लाडू

प्रयाग (गया) येथे एक खूप चांगले पंडित राहत होते. एकदा नेपाळचे राजे सामान्य वेशात पंडितांमागे फिरू लागले, माझ्या आजोबांचे पिंडदान करून द्या, माझ्याजवळ काहीच पैसे नाहीत. थोडेसे लाडू भरून आणलेत तेच दक्षिणा म्हणून स्वीकार करून घ्या. जे लोभी पंडित होते त्यांना पैशाची हाव होती त्यांनी या सामान्य वेशातील राजांना नकार दिला. अशा वेळेस राजांना तेथील एक पंडित गाठ पडला. त्याला महाराजांनी पिंडदान करण्याची विनंती केली. त्याने ती कबूल केली. तो म्हणाला, भाऊ! पैशाची काही बाब नाही. मी पिंडदान करून देतो.


त्या पंडिताने फाटक्या तुटक्या कपड्यात आलेल्या राजांचे पिंडदान पूर्ण करून दिले. यावर महाराज खूश झाले. त्या वेळेस ते त्याला म्हणाले, पंडितजी! या कार्यानंतर काही न काही दक्षिणा मी तुम्हास देणे लागतो. मी घरून काही लाडू आणले आहेत त्याचा तुम्ही स्वीकार करावा.

मात्र या लाडूचे गाठोडे तुम्ही घरी जाऊन उघडावे. पंडित म्हणाले, बरं भाऊ, तुम्ही गरीब दिसता पण तुम्ही प्रेमाने दिलेल्या लाडूचा मी स्वीकार करतो.

या नंतर पंडितास ते गाठोडे देऊन राजे निघून गेले. पंडिताने घरी जाऊन जेवायला बसायची तयारी केली. अचानक त्याला लाडूची आठवण झाली त्यावर त्याने ते गाठोडे सोडून पाहिले असता तो चकित झाला. कारण त्या गाठोड्यात वीस सोन्याचे लाडू होते.

तात्पर्य : कधीही कुणाला कमी समजू नये कारण कोणत्या रुपात कोण असेल याचा भरवसा नाही.

# जीवन का अमृत (भाग १)



हम हर तरफ हरियाली पाते हैं, कोई पतझड़ नहीं, कोई सर्दी गर्मी नहीं, हमें सब कुछ ठीक लगता है। जब कमरा वातानुकुलित होता है, तो चाहे बाहर गर्मी हो लेकिन कमरे में तापमान इतना होता है, जितना शरीर को ठीक लगे। यदि बाहर सर्दी है, तो भी कमरे का तापमान हमारे अनुकूल होता है। यही हालत हमारी होती है, जब हम प्रभु की ज्योति से जुड़ते हैं, शब्द के साथ जुड़ते हैं।

जिंदगी में उतार-चढ़ाव आते रहते हैं, लेकिन हम पर उनका कोई असर नहीं होता क्योंकि हमें यह यकीन हो जाता है कि बाहर की दुनिया माया की है। मानव चोला धारण करने का ध्येय यही है कि हमें अपने आपको जानना है और हम अपना सारा समय उसी ध्येय को पूरा करने में लगायें।

### महापुरुषों का कर्तृत्व

सभी महापुरुषों ने फ़रमाया है कि यदि हम एक घंटा भजन-सुमिरन में देते हैं, तो वह अंतर के मंडलों में हजारों घंटे तपस्या, भजन करने के बराबर है। इस सुनहरे अवसर का हमें पूरा-पूरा फायदा उठाना चाहिए। आगे फरमा रहे हैं :

**सगली रूती हरिआ होइ।**

हमें ऐसे लगने लगता है जैसे हर तरफ़ बहार ही बहार हो, बसंत हो और जब मैं अपने गुरुदेव में लीन हो गया, तो मेरे अंतर में आनन्द ही आनन्द छा गया। जब अंतर में सत्गुरु प्रकट हुए, तभी मैंने सच्ची कमाई की दुनिया की कमाई की जो धन-दौलत, जमीन-जायदाद है, वह सच्ची कमाई नहीं है। सच्ची कमाई केवल प्रभु के साथ जुड़ना है, नाम की कमाई करना है, शब्द के साथ जुड़ना है। जब हम अंतर में प्रभु से जुड़ते हैं, तो हम प्रभु जैसे ही हो जाते हैं। एक सूफी ने इस अवस्था के बारे में कहा है :

उस समय मुझ में और प्रभु में कोई फर्क नहीं रहता। जब हम अपनी आत्मा से गिलाफ हटाते है और अंतर में प्रभु से एकमेक होते हैं, उस समय प्रभु से कोई दूरी नहीं रहती, कोई फर्क नहीं रहता, दैव नहीं रहता, दोनों एक रुप हो जाते हैं, तभी सही मानो में बसंत ऋतु हमारे अंग संग रहती है। इस शब्द में गुरु अर्जनदेव जी महाराज एक आम इंसान की तरह परमात्मा से प्रार्थना कर रहे हैं कि हे परम पिता!

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

सर जगदीश चन्द्र बोस और क्लीव बैकस्टर के अनुसार वनस्पतियां मनुष्य के विचार और भाव को समझती है। विचार और भाव मनुष्य के मन से निर्माण होते हैं। मन आत्मा की एक शक्ति है और शरीर को चलाने वाली चैतन्य शक्ति को आत्मा कहते हैं। आत्मा अति सूक्ष्म प्रकाशमय चैतन्य बिन्दु रूप है। आत्मा ही देह की आँखों से देखती है, कानों से सुनती है, मुख से बोलती है, हाथों से कर्म करती है, पैरों से चलती है। आत्मा की तीन मुख्य शक्तियाँ हैं - मन, बुद्धि, संस्कार। मन विचार करता है, बुद्धि निर्णय करती है और निर्णय अनुसार जो कर्म होते हैं वे संस्कार बन जाते हैं। आत्मा अजर, अमर, अविनाशी है। आत्मा देह के मस्तिष्क में भृकुटी के बीच में निवास करती है और पूरे शरीर पर नियन्त्रण करती है। जैसे एक गाड़ी को चलाने के लिए ड्राईवर की जरूरत होती है, ऐसे ही यह शरीर भी एक गाड़ी है और आत्मा ही उसका ड्राईवर है।

### आज्ञा चक्र

आत्मा के मुख्य सात निजी गुण हैं - ज्ञान, पवित्रता, शान्ति, प्रेम, सुख, आनंद, शक्ति। मनुष्यात्मा जो भी कर्म करती है उस कर्म के संस्कार बनते हैं, फिर उस संस्कार अनुसार ही उनको नया जन्म मिलता है। ऊंच-नीच; गरीब-साहूकार; स्त्री-पुरुष इत्यादि पिछले जन्म के अच्छे वा बुरे कर्म के फल भी उनको इसी जन्म में भुगतने को मिलते हैं।

मनुष्य का शरीर पाँच तत्वों से बनता है और शरीर को तन्दुरुस्त रखने के लिए रोज़ इन तत्वों की आवश्यकता होती है जैसे कि भोजन, हवा, पानी, प्रकाश इत्यादि।

ऐसे ही आत्मा जब सत्य ज्ञान, पवित्रता, शान्ति, प्रेम, सुख, आनंद, शक्ति इन मूल गुणों से सम्पन्न है तो वह शक्तिशाली है।

जब उसके निजी गुणों में कमी आती है तभी रोग (बीमारियाँ) आदि प्रवेश करती हैं। उन शक्तियों को पुन: बढ़ाने वा भरने का साधन है राजयोग। सर्वशक्तिवान परमात्मा को मन-बुद्धि से याद करते हुए उनकी सारी शक्तियाँ और गुण अपने अन्दर समाना, यह अनुभव करने की विधि ही राजयोग है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सर : 'Time' (वेळ) ची definition (व्याख्या) सांगा.
गण्या : Ti (ती) आणि me (मी).

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* फोर्न्स २०२१ च्या रिपोर्टनुसार जागतिक सर्वाधिक कमाई करणारी महिला खेळाडू कोणती? - नाओमी ओसाका

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

मिरेपूड करून ठेवली तर त्याचा स्वाद, गुणधर्म व गंध कमी होतो. कोशिंबीर, आमटी, भाजी, लोणचे व पापडामध्ये मिऱ्याचा वापर करावा. यामुळे पदार्थाची चव वाढते. मिरच्यांपेक्षा मिरे कमी दाहक व अधिक गुणकारी असल्याने अनेक लोक आहारामध्ये त्याचा वापर जास्त करतात. आरोग्य चांगले राखण्याच्या दृष्टिकोनातून मिरे वापरणे हितकारक आहे. थंडीमुळे अंग गारठून आखडले असेल, तर मिरे पाण्यात बारीक वाटून त्याचा लेप अंगावर लावावा. यामुळे त्वचेमध्ये उष्णता निर्माण होऊन स्नायू व्यवस्थित कार्य करतात. रांजणवाडी खूप सुजून डोळ्याची पापणी दुखत असेल, तर मिरे पाण्यात वाटून त्याचा सूक्ष्म कल्क रांजणवाडीवर लावावा. म्हणजे रांजणवाडी त्वरित पिकून फुटते. त्यातील पू निघून गेल्यामुळे आराम मिळतो. फक्त हा लेप लावताना तो डोळ्यात जाणार नाही याची मात्र काळजी घ्यावी. वैद्यांचा सल्ला अवश्य घ्यावा. एखाद्या व्यक्तीला तापामुळे किंवा दुःखद घटना ऐकल्याने बेशुद्धावस्था आली असेल, तर अशा वेळी त्या व्यक्तीच्या नाकामध्ये मिरीचे सूक्ष्म चूर्ण फुकले असता त्याला असंख्य शिंका येऊन त्याची बेशुद्धावस्था नाहीशी होऊन तो शुद्धीवर येतो. अजीर्ण, अपचनाचा त्रास होत असेल, तर सुंठ, मिरी, पिंपळी (त्रिकटू) याचे चूर्ण मधातून चाटण केल्यास अपचनाचा त्रास होत नाही. खूप येऊन अशक्तपणा वाटत असेल व मन बेचैन झाले असेल, तर अशा वेळी चिराईताबरोबर मिरेपूड घेतल्यास मनाची बेचैनी कमी होऊन ताप निघून जातो.

### कोथिंबीर

**सावधानता :**

मिऱ्याचे अतिरिक्त सेवन झाले, तर जठर, आतड्यांमध्ये दाह होणे, पोटात दुखू लागणे, उलट्या होणे, मूत्राशय व मूत्रनलिकेत तीव्र दाह होणे, गुदनलिकेत व शौचाच्या जागी दाह होणे आणि त्वचेवर शीतपित्ताच्या गाठी होणे ही लक्षणे दिसून येतात. अशी लक्षणे आढळल्यास मिऱ्याचा उपयोग सावधानतेने करावा व डॉक्टरांचा त्वरित सल्ला घ्यावा. उन्हाळ्यामध्ये मिऱ्याचा वापर करणे टाळावे. मिऱ्याचा वापर जर योग्य प्रमाणात केला, तर ते रसायनाप्रमाणे कार्य करून रोगप्रतिकारशक्ती वाढवून दीर्घायुष्य प्राप्त होते. म्हणूनच गृहिणीने स्वादिष्ट, रुचकर भोजनासाठी योग्य प्रमाणात सावधानतेने मिऱ्यांचा वापर करावा.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# महिलांनो तुमची लेक तुम्ही स्वतः वाचवा...

## वाट पाहू नका न्याय मिळण्यासाठी अथवा कधी कडक कायदा येईल नवा याची

पुणे भोर तालुक्यातील नरसापूर येथील चार वर्षाच्या चिमुरडीवर ६० वर्षाच्या नराधमाने अत्याचार करून तिला ठार मारले. आपल्या आजोळी सुट्टीसाठी आलेल्या या चिमुरडीला तिच्या आजोबांपेक्षाही मोठा असलेला हा नराधम तुला गोठ्यात गायीचे बछडे वासरू दाखवतो म्हणत तिला सोबत घेऊन जातो. आणि ती चिमुरडी आजोबा समजून त्याच्यावर विश्वास ठेवून आनंदाने बागडत बागडत त्याच्यासोबत गोठ्यामधे जाताना सिसीटीव्हीमधे दिसत आहे. भोळ्याभाबड्या कोवळ्या लेकराला वाटले आजोबा आपल्याला वासरू दाखवतील या कुतूहलाने ती त्याच्यासोबत गेली. त्या कोवळ्या निष्पाप कळीला काय माहीत होते हो कि हा आजोबा आपल्याला मृत्यूकडे घेऊन चाललाय. तिथे त्या कोवळ्या चिमुरडीवर अत्याचार करून कि जिची अजून तिच्या स्वतः सोबत ओळख देखील झालेली नव्हती हे जग कस आहे आणि भविष्यात कस असणार आहे हे काहीच माहीत नव्हते निष्पाप देह तो. त्या ६० वर्षाच्या नराधमाने अत्याचार करून दगडाने ठेचून मारून तिचा मृतदेह पोत्यात भरून शेणाखाली ते पोत गाडून ठेवले. किती अवघड आहे ना स्त्रीजातीचे.

आईने नऊ महिने नऊदिवस तिला पोटात वाढवायचे. जन्म दिल्यानंतर तिला लहानाचे मोठे करताना कित्येक रात्र जागून काढायच्या. डोळ्यात तेल घालून तिला वाढवायचे. आणि अशा नराधमांनी कुठलाही संबंध नसताना तिचे हाल हाल करून तिच्यावर अत्याचार करून तिला मारून टाकायचे. अनेक मुलींचे हाल हाल हाल करून मारून टाकल्या जात आहेत हे आपण सध्या पहात आहोत. आईबाबांनी तिला जन्म नराधमांच्या राक्षसांच्या हातून मरण्यासाठी नक्कीच दिलेला नाही. आता तर कोवळ्या चिमुकल्या मुलींना टारगेट करून तिच्यावर बलात्कार करून मारलं जातय. तिला आमिष दाखवले जातय कारण तिला या घाणेरड्या जगाबद्दल काहीच माहीत नाहीये. त्यामुळे ती आमिषाला बळी पडते. पूर्वी मुलींना बाहेरगावी शिक्षणाला पाठवायला पालक घाबरत असायचे. आईबाबांची नजर आपल्या लेकीवर सतत असावी तिच्यावर कुणाची वाईट नजर पडू नये या काळजीपोटी ते तिला बाहेरगावी शिक्षणाला पाठवत नसायचे. आणि लवकरच तिचे लग्नही लावून दिले जात होते. मोठ्या जबाबदारीतून मुक्त झालो असे आईबाबाला वाटत असायचे. आता काळ भयानक येत चालला आहे. ज्या चिमुरडीच्या हातात खेळण्यासाठी अजून बाहुली असते तिला अजून या समाजाबद्दल काहीच माहीत नसते कोण चांगले कोण वाईट याची जरासीही पुसटसी कल्पनाही नसते त्या कोवळ्या कळ्यांवर अत्याचाराचे प्रमाण वाढत चालले आहे.

महिलांनो तुमच्या पोटी लेकीने जन्म घेतला असेल आणि तुम्ही नोकरी करत असाल तर लेकीला वाचवण्यासाठी तिच्याकडे जराही दुर्लक्ष होऊ नये म्हणून एकवेळेस नोकरी सोडा पन लेक वाचवा. पूर्वी गर्भात मुलींना मारण्याचे प्रमाण जास्त होते पण आता कडक कायदा झाल्यामुळे कोवळ्या कळ्या गर्भात खुडवण्याचे मारण्याचे प्रमाण बंद झाले मग आता कायदा का कमकुवत झालाय ? नरसापूरमधील चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी दया नाहीतर आमच्या ताब्यात दया अशी मागणी जनतेने करत रस्त्यावर आंदोलन केले तर उलट पोलिसांनी जनतेवर लाठीमार केला त्या नराधमाला वाचवत त्याला सुरक्षीत व्हिआयपी सर्व्हिस देत गाडीतून घेऊन गेले. या माणसाने स्वतःच्या पुतणीवर एका वयोवृद्ध महिलेवर याआधी अत्याचार केलेला असताना देखील तो सुटून आला आणि त्यामुळे त्याला कळून चुकले कि बलात्कार केला तरी आपण सुटून येतो. काहीच होत नाही आपल्याला. जेलमधे फुकटचे जेवण मिळते. आणि गुन्हा केला तरी कालांतराने आपली जेलमधून सुटकाही होते. हा माणूस समाजाला लागलेला कलंक होता स्त्रीजातीवर त्याची सतत वाईट नजर होती तर त्याची सुटका व्हायलाच नको होती. चार वर्षाच्या कोवळ्या कळीला यावेळी त्याने टारगेट केले. आपल्या लेकींना वाचवायचे असेल तर हा कुचकामी कायदा काहीच कामाचा राहिलेला नाही आणि जे खाकी वर्दीमधले जनतेचे रक्षक आहेत त्यांच्यावर तर जराही विश्वास राहिलेला चोर सोडून संन्याशाला फाशी द्यायचे काम सध्याचे पोलिस करत आहेत. पालकांनो आगामी काळात लेकीला वाचवण्यासाठी तलवारी जवळ ठेवण्याचीच गरज पडणार आहे जाग्यावर चौरंग्या करायचा. कारण कायदा आपला राहिलेलाच नाही. खर म्हणजे याचा लगेच एनकाऊन्टर व्हायला पाहिजे होता. पन तस होणार नाही कारण आपल्या कायद्यात ते बसत नाही. आपल्या कायद्यात जवळ शस्त्र बाळगायची परवानगी नाही पण आगामी काळात मुलींना शाळेतूनच तलवारबाजी शिकवण्याचे धडे द्यायला हवे. आणि फक्त मुलींना स्वसंरक्षणासाठी जवळ तलवार बाळगण्याची परवानगी शासनाने द्यायला हवी. तुमच्या घरात लक्ष्मी जन्माला आली तिचे स्वागत तुम्ही खुप थाटामाटात करता ना तर मग तिला सतत तुमच्या डोळ्यासमोर ठेवा. कुणावरचं विश्वास ठेवू नका. अगदी नात्यामधील माणसांवर सुद्धा विश्वास ठेवू नका. कारण माणसाची नितीमत्ता खूप घाणेरडी होत चालली आहे विश्वासपात्र कुणीच राहिलेले नाही. लहाणपणापासून कुणाकडून काहीच घ्यायच नाही ही सवय मुलींना लावा. आपल्या बागेतील कोवळ्या कळ्या फुलात रूपांतर होण्याआधी कुणाला खुडवू देऊ नका. एक काम कमी करा पैसा कमी कमवा पन आपली लेक वाचवा ......



शब्दांकन : **सौ. आशा सुधीर साठे,** सैनिकपत्नी, अहिल्यानगर. ९६०४०५६९२८

# प्रेरणादायी अक्षरधन

## सत्याचा पंथ मोठा कठीण







काय खरे, काय खोटे, हे सांगणे मोठे कठीण.

पाहिले, ऐकले, अनुमान निघाले, किंवा अनुभवाला आले आणि ते जसेच्या तसे सांगितले, की त्याला 'खरे' असे नाव मिळाले. मात्र हे सगळे सांगताना दुसऱ्याला पीडा होणार नाही, इकडे लक्ष द्यावे.

वरील सर्व क्रिया संपूर्ण सत्य सांगू शकत नाहीत. ते खोटे नसेल, पण तेवढेच खरे असेल, हे मानणे भ्रामक ठरेल.

म्हणून दुसऱ्याला आनंददायक असेल, तेच सत्य बोलावे. ते सत्य दुसऱ्याला दुःखदायक ठरणारे असेल, तर मौन पाळावे.

एखादे वेळी खरेदेखील खोट्यात जमा होते; जर त्यापायी हिंसा उफाळणार असेल तर, आणि खोटेदेखील खरे ठरते, जर त्यापायी कोणाचे मरण टळणार असले, तर.

म्हणून सत्याचा पंथ मोठा कठीण. सत्याग्रह व सत्याचरण करणे, अगदी विवेकाने व इतरांचे भलेच होईल, वाईट होणार नाही, या उद्देशाने. पण माणूस फक्त स्वार्थासाठी खऱ्याचा हा अर्थ स्वीकारतो. स्वत:च्या आनंदासाठी खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करतो.

एका बेकार तरुणाला एका सर्कशीत काम मिळाले. बाजारातून मटण आणायचे आणि सर्कशीतल्या पिंजऱ्यात कोंडलेल्या वाघाला खाऊ घालायचे. तो तरुण मटण आणायचा आणि पिंजऱ्याच्या गजातून आत फेकून द्यायचा. एकदा मालकाने ते पाहिले आणि तो म्हणाला, हे काय करतोस? असं वाघाला भिऊन गजातून मटण आत फेकतोस ? हे चूक आहे. पिंजऱ्याच दार उघडायचं आणि वाघाच्या तोंडात मटण कोंबायचं. वाघाचे आम्हाला उघड्यावर खेळ करायचे असतात. माणूस वाघाला भीत नाही, असं त्या वाघाला सतत वाटलं पाहिजे.'

तरुणाने लगेच नोकरीचा राजीनामा दिला. मालक म्हणाला, का रे राजीनामा देतोस? तरुण म्हणाला, मी वाघाला फसवू इच्छित नाही.

हे उत्तर खरे नाही. खरे उत्तर, हे शक्य नाही. कारण मला वाघाची भीती वाटते. पण ते प्रतिष्ठेला बाधते, मनाला दुःख देते; म्हणून तरुणाने ते टाळले. निवृत्तिनाथ म्हणतात,

मृगजळ पाणी हेही आहे पाणी ।
सत्य मिथ्या दोन्ही केली कैसी ।
सत्य असत्य वचने हे दोन ।
बोलविता कोण सांग माते ।

हरणांना मृगजळ हे पाणी वाटते. सगळ्यांनाच तसे दिसते; पण वास्तवात पाणी दुसरेच असते. जगात खरे आणि खोटे दोन्ही प्रकारचे बोलणे सर्रास खपते आहे. हे असे दोन्ही प्रकार कोण बोलायला लावतो? जगाच्या कल्याणासाठी असे बोलवले जाते.

**– किशोर गांधी**

# श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत बापूसाहेब गायकवाड यांचा सेवानिवृत्ती सोहळा

नगर – श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत ज्येष्ठ शिक्षक गायकवाड बापूसाहेब सुखदेव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित समारंभ भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या मूर्ती पूजनाने करण्यात आली. या प्रसंगी संस्थेचे सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपाध्यक्ष दीपक ओहोळ, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, खजिनदार संजय कुलकर्णी, सदस्य स्वप्निल कुलकर्णी, सुनील जोशी उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सौ. अनघा अत्रे, माजी मुख्याध्यापक दुर्योधन कासार, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या चारही शाळांमधील शिक्षक व कर्मचारी, तसेच गायकवाड सरांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.



श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत ज्येष्ठ शिक्षक गायकवाड बापूसाहेब सुखदेव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित समारंभ भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका वसुधा जोशी यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात सुरेश क्षीरसागर म्हणाले की, गायकवाड सरांनी आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञानच नाही तर संस्कारांचीही रुजवण केली. त्यांची कार्यनिष्ठा, शिस्त आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी ही सर्व शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमात सहकारी शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनीही गायकवाड सरांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. अनेकांनी सरांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या मार्गदर्शनामुळे आयुष्यात घडलेले बदल सांगितले. वातावरणात भावनिक क्षण निर्माण झाले होते.

यावेळी मनोगतात गायकवाड बापूसाहेब सुखदेव यांनी सांगितले की, शिक्षक म्हणून काम करताना मला विद्यार्थ्यांकडून खूप काही शिकायला मिळाले. संस्थेने दिलेल्या संधीमुळेच मी माझे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडू शकलो. माझ्या सहकाऱ्यांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांचे प्रेम हेच माझे खरे यश आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संकेत शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन सुनील रायकर यांनी केले.

# कोणत्याही समस्येवरील उत्तर म्हणजे उल्हास दुगड

### अशोक मुथा यांचे प्रतिपादन



भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त त्यांचा सत्कार करताना अशोक मुथा आदी.

## भाऊसाहेब फिरोदियाचे मुख्याध्यापक यांच्या सेवापूर्तीनिमित्त गौरव

नगर – भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे सखोल अभ्यासू, खेळाडू व्यक्तिमत्वाने आपल्या तत्त्वांशी तडजोड न करता आजपर्यंत नियोजनबद्धते मुळे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या गुणवत्तेतील प्रगतीचा आलेख उंचावत नेलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाची विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व संस्थेस आजही खरोखरच गरज असल्याचे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अशोक मुथा यांनी केले.

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात अध्यक्षीय भाषणात मुथा बोलत होते. या सेवापूर्ती सोहळ्यास संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त मंडळाचे सदस्य गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, तसेच अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, माजी मुख्याध्यापक अजय कुमार बारगळ, बाबुराव ठोकळ, विजयकुमार जगदाळे, कुसुम मावची, उपमुख्याध्यापक दत्तात्रय पानमळकर, रावसाहेब बाबर, सुषमा चिटमील, पोपटराव पवार, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, बाणेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक बाळासाहेब वाकचौरे, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे उपमुख्याध्यापक कैलास साबळे, पर्यवेक्षक वैभव कुलकर्णी, कल्पना पाठक तसेच शिक्षक वृंद, कर्मचारी उपस्थित होते.

पुढे बोलताना मुथा यांनी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विकासामध्ये त्यांचा खारीचा वाटा आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नसल्याचे सांगून, त्यांच्या कार्याचा आढावा घेतला.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी उल्हास दुगड सरांच्या नियोजनबद्ध कामाचे, प्रामाणिकपणाचे, तत्वांशी तडजोड न करता प्रगतीचा आलेख उंचावत नेणाऱ्या कामाचे कौतुक करून त्यांना त्यांच्या पुढील निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या व संस्थेस उल्हास दुगड सारख्या मुख्याध्यापकांची गरज असल्याचे सांगून, निवृत्तीनंतर त्यांची उणीव भासणार असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, गौरव मिरीकर, मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, माजी मुख्याध्यापक अजय कुमार बारगळ, माजी उपमुख्याध्यापक रावसाहेब बाबर, उज्वला कळमकर, विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, वैभव कुलकर्णी तसेच विद्यालयाच्या ज्येष्ठ अध्यापिका सुलभा कुलकर्णी, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित यांनी आपल्या मनोगतातून सरांच्या विकास कामाच्या आठवणींना उजाळा दिला.

एक आदरयुक्त भीती असणारे, वार्षिक कामाचे उत्तम नियोजन, समान कामाची विभागणी, योग्य पद्धतीने काम करून घेण्याचा हातखंडा असलेले, विद्यार्थी प्रिय, शिक्षक प्रिय, मुख्याध्यापक तसेच राज्य राष्ट्रीय क्रीडा प्रकारात २९ सुवर्ण, ६ रोप्य, ३ कांस्यपदकांची कमाई, नवव्या आशियाई क्रीडा स्पर्धा मलेशिया येथे भारताचे प्रतिनिधित्व करणारे तसेच भालाफेक, थाळीफेक, गोळा फेक, तिरंदाजी यामध्ये निष्णात असणारे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीत १९८९ रोजी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू होऊन भिंगार हायस्कूलमध्ये उपमुख्याध्यापक तर महेश मुनोत विद्यालय वांबोरी या ठिकाणी मुख्याध्यापक पदाची सूत्रे हातात घेऊन पुन्हा भाऊसाहेब फिरोदिया या ठिकाणी मुख्याध्यापक म्हणून पदभार स्वीकारून एकूण ३७ वर्ष कामकाज पाहिले. असे प्रास्ताविकेतून गंधाली पटवर्धन यांनी सरांच्या कामाचा आढावा घेतला.

सत्कारास उत्तर देताना भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड यांनी आपल्या मनोगतातून अशोकभाऊ फिरोदिया यांनी दिलेल्या संधीमुळे व छायाताई फिरोदिया यांनी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळेच त्यांनी आपल्या कार्याचा झेंडा कायमच उंचावत ठेवला. पत्नी, मुले, भाऊ–बहीण, शिक्षक वृंद विद्यार्थी यांच्या सहकार्यामुळे आजपर्यंत ते मुख्याध्यापक पदाची सूत्रे व्यवस्थित सांभाळू शकले.

जैन ओसवाल युवक सेवा संघ ट्रस्ट तर्फे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वासाठी कृतज्ञता पत्र देण्यात आले. सरांसारख्या आदर्श, प्रेरणादायी व्यक्तिमत्वाने आजपर्यंत हजारो विद्यार्थी घडवले. त्यांच्या प्रेरणेने अनेकांनी यशाची शिखरे पार केली. त्यांच्या मार्गदर्शनाची आजही त्यांच्या विद्यार्थ्यांना गरज आहे. असे उद्गार जैन ओसवाल युवक संघ ट्रस्टचे अध्यक्ष भूषण भंडारी यांनी काढले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ अध्यापिका शुभांगी जोशी यांनी केले. राजेंद्र जाधव यांनी आभार मानले.



मुख्याध्यापक असोसिएशनच्या वतीने अँग्लो उर्दू हायस्कूल, जामखेडचे मुख्याध्यापक शेख युनुस अकबर यांच्या ३२ वर्षांच्या उल्लेखनीय सेवापूर्तीनिमित्त त्यांचा सपत्निक सन्मान करताना शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड आदी.

# मुख्याध्यापक शेख युनुस अकबर यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**शिक्षकांनी घडवलेली विद्यार्थ्यांची पिढी हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख : शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड**

नगर – अहमदनगर जिल्हा उर्दू मुख्याध्यापक असोसिएशनच्या वतीने अँग्लो उर्दू हायस्कूल, जामखेडचे मुख्याध्यापक शेख युनुस अकबर यांच्या ३२ वर्षांच्या उल्लेखनीय सेवापूर्तीनिमित्त त्यांचा सपत्निक सन्मान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ व समर्पित योगदानाची दखल घेत हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

अंजुमन तरक्की–ए–तालीम खर्डा, जामखेड संचलित अँग्लो उर्दू हायस्कूल जामखेडचे मुख्याध्यापक शेख युनुस अकबर यांच्या सेवापूर्तीचा कार्यक्रम अहिल्यानगर शहरात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी शिक्षण संचालक दिनकरराव टेमकर यांनी भूषवले, तर माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड प्रमुख उपस्थित होत्या.

कार्यक्रमास संस्थापक सचिव मुप्टा शि. संघटनेचे सुनिल मगरे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन अप्पासाहेब शिंदे, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, माजी सहा. आयुक्त व कास्ट्राईबचे राज्य अध्यक्ष एन.एम. पवळे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनील पंडीत, प्रा.जि.आय.टी.आय. चे प्रा. खालिद जहागिरदार, विशेष सहा. सरकारी वकील अ‍ॅड. तौसीफ बागवान, उबेद शेख, डॉ. शेख तसनीम सदफ युनुस उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड म्हणाल्या की, शेख युनुस अकबर सर यांचा ३२ वर्षांचा सेवाप्रवास हा शिक्षण क्षेत्रासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांचे कार्य निस्वार्थ सेवा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी घडवलेली विद्यार्थ्यांची पिढी हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. निवृत्तीनंतरही त्यांचा अनुभव व मार्गदर्शन समाजासाठी मोलाचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उबेद शेख यांनी शेख युनुस यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले.

माजी शिक्षण संचालक दिनकरराव टेमकर यांनी सांगितले की, शेख युनुस अकबर यांनी अँग्लो उर्दू हायस्कूल, जामखेड येथे कार्य करताना केवळ शैक्षणिक गुणवत्ताच उंचावली नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीही मोलाचे योगदान दिले. अशा कर्तव्यनिष्ठ शिक्षकांमुळेच शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम बनते. निवृत्ती हा त्यांच्या कार्याचा शेवट नसून नव्या अध्यायाची सुरुवात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहमदनगर जिल्हा उर्दू मुख्याध्यापक असोसिएशनच्या आजी–माजी मुख्याध्यापकांचे सहकार्य लाभले.



### जैन वात्सल्य संस्थेच्यावतीने गरजू कुटुंबांना किराणा वाटप

श्री जैन ओसवाल वात्सल्य संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजातील गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा व अन्नधान्य वितरित करण्यात येते. धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील सचिन अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर प्रमोद गांधी (वांबोरीवाला) यांच्या हस्ते या मदतीचे वाटप करण्यात आले. यावेळी सेक्रेटरी विजय गुगळे, सचिन कोठारी व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सारडा महाविद्यालयाचे प्रबंधक अशोक असेरी सेवानिवृत्त

नगर – सारडा महाविद्यालयाचे प्रबंधक अशोक असेरी हे ३७ वर्षांच्या कारकीर्दीनंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने महाविद्यालयात आयोजित निरोप समारंभात हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी यांच्या हस्ते त्यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.मधुसूदन मुळे होते. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, सारडा महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व ब्रिजलाल सारडा, संचालक अनंत देसाई, प्रा.ज्योती कुलकर्णी, विलास बडवे, बाळासाहेब पतंगे, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, सौ. वैशाली जोशी व सौ.सुवर्णा असेरी आदींसह प्राध्यापक, माजी प्राध्यापक उपस्थित होते.



संजय जोशी म्हणाले, सारडा महाविद्यालयाच्या प्रगतीत अशोक असेरी यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी कायम सर्वांना सहकार्य करण्याबरोबरच वेळेत व तत्परतेने सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्याने महाविद्यालयाच्या प्रगतीला वेग मिळाला.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, प्रबंधक हे महाविद्यालयातील अत्यंत महत्वाचे पद असते. या पदाच्या माध्यमातून अशोक असेरी यांनी अभ्यासपूर्ण व उत्कृष्ट काम केले आहे. त्यांच्या कारकीर्दीत महाविद्यालयात चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्याने महाविद्यालयाच्या प्रगतीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, ३७ वर्षांच्या कारकीर्दीत अशोक असेरी यांनी सारडा महाविद्यालयाच्या भौतिक प्रगतीला चालना देत पदाला योग्य न्याय दिला आहे. त्यांचे हे कार्य सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना प्रेरणादायी ठरेल.

यावेळी प्रा.मधुसूदन मुळे, अजित बोरा, ब्रिजलाल सारडा, प्रा.राजेंद्र मारवाडे, प्रा.देवदत्त रानडे, प्रा.राजेंद्र काळे, प्रा.डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त करून अशोक असेरी यांचे कौतुक केले. मनोगत व्यक्त करताना अशोक असेरी हे भारावल्याने पाणावलेल्या डोळ्यांनी त्यांनी सर्वांचे ऋण व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले. उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, पर्यावेक्षक प्रा.राजू रिक्कल, प्रा.महेश कुलकर्णी व प्रा.सुजित कुमावत, योगेश देशमुख, सुनील सुसरे आदींसह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# गृहउद्योगातून महिलांची आर्थिक उन्नती शक्य

## संध्या मेढे यांचे आवाहन, कल्याण रोड अनुसयानगर येथे महालक्ष्मी महिला मंडळाचा महिला सक्षमीकरणाचा उपक्रम; रोजगार निर्मिती व गृहउद्योगाचे उद्घाटन

नगर – प्रत्येक महिलेमध्ये काहीतरी करण्याची क्षमता असते. फक्त तिला संधी आणि योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे. गृहउद्योगाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होऊ शकते आणि त्या आपल्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करू शकतात. त्यांनी महिलांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या उत्पादनांचे मार्केटिंग करावे आणि स्वतःचा ब्रँड निर्माण करावा, असे आवाहन संध्या मेढे यांनी मार्गदर्शन करताना केले.

सर्वसामान्य कुटुंबातील महिलांच्या हाताला काम मिळावे, त्यांना स्वावलंबी बनवावे आणि घराघरात लघुउद्योगांची उभारणी व्हावी या उद्देशाने कल्याण रोड, अनुसयानगर येथील महालक्ष्मी महिला मंडळाच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त महिला सक्षमीकरण, रोजगार निर्मिती व गृहउद्योग उपक्रमाचे उद्घाटन झाले. या उपक्रमामुळे परिसरातील महिलांसाठी स्वावलंबनाचा नवा मार्ग खुला झाला आहे.


महालक्ष्मी महिला मंडळाच्या वतीने महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त गृहउद्योग उपक्रमाचे उद्घाटन झाले. (छाया : लहू दळवी)

या उपक्रमासाठी सीमा शिंदे यांनी पुढाकार घेत परिसरातील महिलांना एकत्र करून रोजगार निर्मितीचे काम उभे केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक महिलांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार असून कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लागणार आहे. महिलांच्या पाठीशी उभे राहून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम अ‍ॅड. युवराज शिंदे यांनी केले असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाला रेश्माताई आठरे, सीमा शिंदे यांच्यासह परिसरातील महिला उपस्थित होत्या.

रेश्माताई आठरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महिलांसाठी शासनाच्या अनेक योजना उपलब्ध आहेत, मात्र त्यांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचत नाही. महालक्ष्मी महिला मंडळाच्या माध्यमातून ही दरी कमी करण्याचे काम केले जाईल. त्यांनी महिलांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर गृहउद्योगात यश मिळवावे, असा विश्वास व्यक्त केला.

सीमाताई शिंदे यांनी सांगितले की, कल्याण रोड परिसरातील सर्वसामान्य महिलांच्या हाताला काम मिळावे, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व विकासात्मक उपक्रम राबवत असताना महिलांसाठी काहीतरी ठोस काम करण्याची गरज जाणवत होती. त्यातूनच गृहउद्योग व रोजगार निर्मितीचा हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, येत्या काळात अधिकाधिक महिलांना या उपक्रमात सहभागी करून त्यांना स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.


१२ वीच्या परीक्षेमध्ये प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य अंजली बोधक आदी.

# ‘प्रियदर्शनी स्कूल अ‍ॅण्ड कॉलेज’च्या उज्वल यशाची परंपरा कायम

नगर – भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अ‍ॅण्ड ज्युनियर कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी इयत्ता बारावी सायन्स १००% निकालाची परंपरा कायम ठेवून स्वामी राहुल साळुंखे याने ८८.३३ % गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला. तसेच यथार्थ श्रीकांत गवळी ८८.१७%, अनुष्का सुनील सांगळे ८६.८३ %,मृण्मयी दत्तात्रेय गिरमे ८६.५० %आणि संकेत सुभाष जाधव ८५.५०% गुण मिळवून कॉलेजच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, कॉलेजच्या प्राचार्य श्रीमती अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे व पर्यवेक्षक कु.अनिता थापा आणि शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सेंट विवेकानंद स्कूलमध्ये पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ



नगर – अहमदनगर सिंधी एज्युकेशन सोसायटीच्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये पूर्व–प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ २९ एप्रिल रोजी उत्साहात पार पडला. या समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सी.ए. शबनम हर्दवानी धुप्पड यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या मनमोहक स्वागत नृत्याने झाली. त्यानंतर सौ. कनन शेरवानी व सौ. करिश्मा शेख यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देत त्यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला.

पूर्व–प्राथमिक विभागाच्या प्राचार्या सौ. कांचन पापडेजा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरित केले.

तसेच माध्यमिक विभागाच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, शिस्त व चिकाटीच्या बळावर यश संपादन करण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सी.ए. शबनम हार्दवानी धुप्पड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पालकांना मुलांना सकारात्मक पद्धतीने घडविण्याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये यूकेजी ‘अ’ मधील बानी कौर गुलाटी व यूकेजी ‘ब’ मधील ज्योत्सना बाळासाहेब पठारे यांचा विशेष गौरव करण्यात आला. पालक प्रतिनिधी म्हणून सुमित अधात व सौ. रेणुका ब्रह्मे यांनी मनोगत व्यक्त करून शाळेच्या कार्याचे कौतुक केले. तसेच वर्गशिक्षिका सौ. गुंजन पंजवानी व सौ. दीपा आहुजा यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. अमऋता कारामुंगे व जूही पर्यानी यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामचंद् मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त सुरेश हिरानंदानी व राजकुमार गुरुनानी, महेश मध्यान, हरेश मध्यान तसेच प्राचार्या गीता तांबे व मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा उपस्थित होत्या.

संस्थेचे विश्वस्त सुरेश हिरानंदानी यांनी पूर्व–प्राथमिक विभागातील सर्व पदवीधरांचे अभिनंदन केले आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी अथक परिश्रम घेतल्याबद्दल पूर्व–प्राथमिक शिक्षकांचे कौतुक केले.

इयत्ता पहिलीच्या वर्गशिक्षिका नम्रता कुकरेजा आणि प्रीती कटारिया यांचा परिचय करून देण्यात आला.

समारंभात यूकेजी ‘अ’ व ‘ब’ च्या विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा विधिवत पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी सौ. कनन शेरवानी व सौ. करिश्मा शेख यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थितांचे ऋण व्यक्त केले.

हा समारंभ विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, संस्मरणीय व त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


अहिल्यानगर बास्केटबॉल संघात निवड झालेले केडगाव स्पोर्टस् अकॅडमीचे खेळाडू.

# केडगाव स्पोर्टस् अकॅडमीचे ७ खेळाडू अहिल्यानगर बास्केटबॉल संघात

नगर – सातारा येथे होणाऱ्या सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेसाठी केडगाव स्पोर्टस् अकॅडमीच्या सात खेळाडूंची अहिल्यानगर सब ज्युनिअर संघात निवड झाली आहे. मुलांमध्ये ध्रुव गुगळे, आदिराज कोतकर, कृष्णा ठुबे, क्रांतिक बढदे, शिवराज भस्मे, मुलीमध्ये, तनिष्का बारहाते, अक्षरा कोतकर यांचा समावेश आहे.

नुकतेच सातारा येथे महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशन सब ज्युनिअर स्पर्धेला प्रारंभ झाले असून, या स्पर्धेमध्ये सदर खेळाडू अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. खेळाडूंना प्रशिक्षक छबुराव कोतकर व स्वाती बारहाते यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, ऊर्जा गुरुकुल शाळेच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, ज्ञानसाधना गुरुकुल कलासेसचे संचालक प्रा. प्रसाद जमदाडे, डॉ. देवेशकुमार बारहाते, विक्रम लोखंडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# भावी पिढीतील दृष्टीदोष दूर करण्यासाठी आनंदऋषीजी नेत्रालयाचा दिशादर्शक उपक्रम

## मंगलाताई रुणवाल यांचे प्रतिपादन, मोफत बाल नेत्रतपासणी व तिरळेपणा उपचार शिबिराला प्रतिसाद

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णांना नवजीवन देण्याबरोबरच दृष्टीदोषामुळे अंधारलेल्या जीवनात प्रकाश आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांसाठी येथील नेत्रालय मोठा आधार ठरत असून, आर्थिक अडचणीमुळे कोणाचाही उपचार थांबू नये या उद्देशाने सेवाभावातून रुग्णसेवा सुरू आहे. अनुभवी तज्ञ डॉक्टरांच्या योगदानामुळे हे हॉस्पिटल मानवसेवेचे प्रभावी केंद्र बनले आहे. भावी पिढीतील दृष्टीदोष दूर करण्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मंगलाताई रुणवाल यांनी केले.


जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालय येथे आयोजित मोफत बाल नेत्रतपासणी व तिरळेपणा उपचार शिबिराचे उद्घाटन करताना मंगलाताई रुणवाल आदी.

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालय येथे आयोजित मोफत बाल नेत्रतपासणी व तिरळेपणा उपचार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी स्मितेश रुणवाल, सतीश रुणवाल, प्रेमभाऊ बोथरा, मनिषा बोथरा, संतोष बोथरा, संगीता बोथरा, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा, गौरव बोथरा, रोहन बोथरा, डॉ. अशोक महाडिक, बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे, नेत्रालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड, श्याम चोरडिया, माणकचंद कटारिया, रवींद्र भंडारी, प्रकाश छल्लाणी आदींसह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, मागील अनेक वर्षांपासून आनंदऋषीजी नेत्रालयात हजारो शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. लहान मुलांमधील दृष्टीदोष निर्मूलनासाठी नेत्रालयाने पुढाकार घेतला असून, वाढत्या डोळ्यांच्या समस्या वेळेवर लक्षात येत नाहीत. त्यामुळे पालकांनी जागरूक राहण्याची गरज आहे. मनपा व जिल्हा परिषद शाळांमधील साडेतीन हजार विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली आहे. गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्यात येत असून, निवडक मुलांवर उन्हाळी सुट्टीत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभही दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रेमभाऊ बोथरा म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ‘दवा’सोबत ‘दुवा’ मिळत असल्याने संपूर्ण देशभर हॉस्पिटलची ख्याती पसरली आहे. गोरगरिबांना उपचाराची संधी उपलब्ध करून देत असताना तज्ञ डॉक्टरांचेही मोलाचे योगदान मिळत आहे. दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर उपचार सुरू असून, सक्षम भावी पिढी घडविण्याचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आनंद छाजेड यांनी सांगितले की, लहान मुलांमध्ये वाढत्या नेत्र समस्यांच्या पार्श्वभूमीवर या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, हे शिबिर महिनाभर सुरू राहणार आहे. बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे हे तिरळेपणा व इतर नेत्र विकारांवरील उपचारासाठी उपलब्ध आहेत. ते जिल्ह्याचे सुपूत्र असून, हैदराबाद येथील एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट, हैद्राबाद मध्ये गेल्या १६ वर्षांपासून कार्यरत होते व आता पूर्ण वेळ आनंदऋषिजी नेत्रालय येथे सेवा देत आहेत. आफ्रिका, युरोप आणि अमेरिका येथेही त्यांनी काम केले असून, तिरळेपणा उपचारात विशेष प्राविण्य मिळवले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे मोठ्या शहरांमधील रुग्णदेखील येथे उपचारासाठी येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. निरंजन पेहेरे यांनी सांगितले की, नेत्र विकार लहान वयात ओळखून योग्य उपचार केल्यास भविष्यातील गंभीर धोके टाळता येतात. लहान मुलांना त्यांच्या दृष्टीदोषाची जाणीव होत नसल्याने पालकांनी नियमित तपासणी करणे आवश्यक आहे. तिरळेपणा ही एकप्रकारची अपंगत्वाची स्थिती असून, यामुळे आत्मविश्वास कमी होतो तसेच करिअर व वैयक्तिक आयुष्यात अडचणी निर्माण होतात. थ्री–डी व्हिजनवरही परिणाम होतो. मात्र योग्य वेळी उपचार केल्यास हे दोष पूर्णपणे दूर करता येतात. आनंदऋषी नेत्रालयात या सर्व उपचारांची सुविधा उपलब्ध असून, पालकांनी मुलांच्या दृष्टीदोषाकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

या शिबिरात डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ. नचिकेत पारगावकर, डॉ. कुशल शहा, डॉ. किरण ढेरे, डॉ. ऋषिकेश डेरे, डॉ. सारडा यांनी देखील नेत्र तपासणी केली. शिबिरात तीनशे पेक्षा अधिक बालकांची नेत्र तपासणी करण्यात आली असून, तिरळेपणावर आवश्यक त्या शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहेत.

### गुरु–शिष्याच्या भेटीने रंगला भावनिक क्षण

बाल नेत्ररोग तज्ञ डॉ. निरंजन पेहेरे यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देणारा भावनिक प्रसंग शिबिरात घडला. त्यांच्या रेसिडेन्शीअल विद्यालयातील शिक्षिका मंगला तवले यांनी पेपरमध्ये शिबिराची जाहिरात पाहून खास त्यांची भेट घेण्यासाठी उपस्थिती लावली. दहावी बोर्डाच्या परीक्षेत गुणवंत ठरलेला हा विद्यार्थी आज यशस्वी डॉक्टर झाल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. अचानक झालेल्या या भेटीने डॉ. पेहेरे यांनीही आनंद व्यक्त केला. या गुरु–शिष्याच्या भेटीने उपस्थितांना भावनिक क्षण अनुभवायला मिळाला.


हरित शहर मोहिमेतील सहभागाबद्दल नवजीवन प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांचा विशेष सन्मान करताना जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील. समवेत महापौर ज्योती गाडे, उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, उद्योजक राजाभाऊ मुळे, आयुक्त यशवंत डांगे व इतर (छायाचित्र : ऋषिकेश राऊत)

# काष्टी येथील परिक्रमा सायन्स कॉलेजची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

नगर – श्रीगोंदा तालुक्यातील बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट चे परिक्रमा सायन्स कॉलेज या विद्यालयाचा इयत्ता बारावी फेब्रु/मार्च २०२६ परीक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ यांचेकडून जाहीर झाला असून यामध्ये विज्ञान शाखेतून ८७.१७% गुण मिळवून प्रथम अनुष्का गणेश जाधव ८६.८३% गुण मिळवून द्वितीय मयूर किरण यादव तर ८६.६७% गुण मिळवून दीप अतुल लगड तृतीय आला.

वाणिज्य शाखेत संदीप रमेशकुमार चौधरी ८८.६७% गुण मिळवून प्रथम यश पोपट काळे ८४.३३% गुण मिळवून द्वितीय तर अथर्व प्रकाश तोडकर ६४.५०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळाला आहे. अशी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला असून विद्यालयाचा विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९९.७०% व वाणिज्य शाखेचा एकूण निकाल १००% एवढा लागला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक बबनराव पाचपुते, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, संस्थेचे सचिव आ.विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतापसिंह पाचपुते, अ‍ॅकॅडेमीक डायरेक्टर सौ.डॉ.इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, डेप्युटी अकॅडेमीक डायरेक्टर डॉ.संजीव कदम पाटील, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. इथापे पी.ए. व सर्व विभागाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# ‘रामकृष्ण’च्या विद्यार्थ्यांनी मिळवले घवघवीत यश


मेहक डुंगरवाल, रिया मणियार, अन्वेषा मंत्री, खुशी टिपुळे, हर्षल फसले, प्रणव वाघमारे

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स ज्युनियर कॉलेजचा इयत्ता बारावी (विज्ञान व वाणिज्य) शाखेचा २०२५–२६ चा निकाल उल्लेखनीय लागला आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९७.५ % तर वाणिज्य शाखेचा १०० % नोंदवण्यात आला.

विज्ञान शाखेत खुशी प्रकाश तिपुळे हिने ८५.६७ % गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. हर्षल संदीप फसळे (८०.३३ %) द्वितीय, तर अन्वेषा विवेक मंत्री (७९.१७ %) तृतीय क्रमांकावर राहिली. विषयानुसार गुणवत्तेत इंग्रजीत नेहल अविनाश चारगुंडी (९०/१००), रसायनशास्त्र व भौतिकशास्त्रात खुशी तिपुळे (७४/१०० व ८३/१००), तर जीवशास्त्रात यश्वी हर्षल पटेल (७७/१००) गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. गणित विषयात अनया अमोल तांबोळी व मानसी मेघराज चाकोर यांनी प्रत्येकी ९८/१०० तसेच भूगोल व माहिती तंत्रज्ञानात निमिष रुपेश शिदोरे याने अनुक्रमे ९५/१०० व ९७/१०० गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. इलेक्ट्रॉनिक्स विषयात हर्षल फसळे याने २०० पैकी १७९ गुण मिळवत लक्षवेधी यश संपादन केले.

वाणिज्य शाखेत मेहेक भूषण डुंगरवाल हिने ९४.५० % गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. रिया किरण माणियार (९२.८३ %) द्वितीय, तर प्रणव विजय वाघमारे (९१.८३ %) तृतीय क्रमांकावर राहिला. विषयानुसार गुणवत्तेत इंग्रजीत मेहेक डुंगरवाल (९०/१००), अकाउंटन्सीत रिया माणियार व शुभ दीपक खंडेलवाल (१००/१००), तसेच ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्समध्ये प्रिशा प्रविण अगरवाल (९५/१००) यांनी प्रथम क्रमांक मिळवला.


गणितात रोहन मनीष बोरा (९६/१००), सेक्रेटेरियल प्रॅक्टिसमध्ये कनिष्क हनीश सबलोक (८७/१००), तर माहिती तंत्रज्ञानात मेहेक डुंगरवाल (९७/१००) यांनी उच्च गुण मिळवले. अर्थशास्त्र विषयात कनिष्क सबलोक, दिव्यांका किशोर तलरेजा व जय संजय गांधी यांनी प्रत्येकी ९९/१०० गुण मिळवत विशेष प्रावीण्य मिळवले.

विद्यार्थ्यांच्या या यशासाठी अपराईज अकॅडमीचे सीए उमेश डोडेजा, सी ए चिराग कासवा, सौ. प्रज्ञा मुनोत, आशिष तटू तसेच संस्थेचे शिक्षक सौ. वृषाली पितळे, सौ. शिल्पा दिवटे, सौ. सरला काथेड, सौ. नितल फिरोदिया, ध्रुवा परदेशी, श्रेयाकुमार गुंडू, अजित लोळगे यांनी परिश्रम घेतले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, संस्थेचे उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन नंदकुमार झवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना व राजेश झवर, सचिव डॉ. शरद कोलते, उपसचिव बजरंग दरक, प्राचार्या गगनदीप वाधवा आणि उपप्राचार्या संपदा देशपांडे समन्वय सुषमा उजागरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# युवा मानस

# चेक्सचा शर्ट खरेदी करताना



फॅशन पॅशन

चेक शर्ट खरेदी करायला गेल्यानंतर तुमच्या मनात अनेक प्रश्न उपस्थि होत असतील. मला व्यवस्थित दिसेल का? माझ्यावर कोणता रंग सूट होईल? ऑफिसमध्ये हे कपडे चालतील का? यासारखे अनेक प्रश्न पडत असतील. कारण.. स्टाइल म्हटल्यानंतर सर्वात पहिल्यांदा कपड्यांना पाहिलं जातं. त्यानंतर इतर गोष्टींकडे पाहतात.

शर्टचा रंग – चेक शर्ट घेताना सर्वात आधी रंग पाहून मुलं खरेदी करतात; पण लक्षात ठेवा चेक शर्ट खरेदीकरताना न्यूट्रल रंगाच्या शर्टची निवड करा. तुमच्या अंगावर डार्क रंग सूट होत असेल, तरच तसा चेक शर्ट खरेदी करा.

फॅब्रिक – चेक्स शर्ट खरेदी करताना फॅब्रिककडे लक्ष ठेवा. बटन लावल्यानंतर शर्ट चांगला दिसेल, असे फॅब्रिक निवडा.

पॅटर्न– चेक्स शर्ट खरेदी करताना रंगाबरोबरच पॅटर्नकडेही तेवढेच लक्ष द्या. जसे छोटे चेक्स शर्ट स्मार्ट लूक देतात, तर मोठ्या चेक्सचे शर्ट कॅज्युअल लूकसाठी परफेक्ट आहेत.

चेक्स आहे बोल्ड पॅटर्न– चेक्सचे कपडे बोल्ड पॅटर्नमध्ये ग्राह्य धरले जातात. त्यामध्ये अनेक प्रकारचे विकल्प असतात. पुरूषांनी नेहमीच प्लेन किंवा लायनिंगवाले कपडे न घेता चेक्स शर्टांचीही निवड करावी. तुमचा लूक आधिक चांगला दिसू शकतो.

# ९९ रुपयांपासून आठ कोटींवर

अचिव्हर

उत्तर प्रदेशातील मेरठ येथील अतुल्य कौशिक यांनी वेल्लोर येथून संगणक शास्त्रात बी. टेक. पदवी घेतली. पदवी पूर्ण झाल्यावर त्यांनी गूगल पे आणि इंस्टामोजो सारख्या नामवंत कंपन्यांमध्ये काम केले. या अनुभवात त्यांना विद्यार्थ्यांना नोकरी मिळवण्यासाठी योग्य तयारीची कमतरता जाणवली. याच कमतरतेतून त्यांना स्वतः चा उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळाली. अतुल्य यांनी मनीष अग्रवाल आणि आशय मिश्रा या दोन मित्रांना सोबत घेऊन छोटासा पण प्रभावी प्लॅन तयार केला. ९९ रुपयात सुरु केलेला व्यवसाय आज ८ कोटींपर्यंत गेला आहे.

नोकरीत असतानाच अतुल्य आणि त्यांच्या मित्रांनी 'मायगीकमंकी' नावाची वेबसाइट सुरू केली. येथे विद्यार्थ्यांसाठी नोकरीसंबंधी टिप्स आणि मार्गदर्शन फक्त ९९ रुपयात उपलब्ध करून दिले. पहिल्या दिवशीच २९७ रुपये कमाई झाली. पुढे नऊ महिन्यांत ही कमाई ४५ लाखांवर पोहोचली. या यशानंतर हा व्यवसाय पूर्णवेळ करायला हवा, याची तिघांना खात्री पटली. त्यामुळे त्यांनी नोकऱ्या सोडल्या आणि पूर्ण लक्ष देण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला 'मायगीकमंकी' नावाने सुरू झालेल्या व्यवसायाला नवीन ओळख देण्यासाठी अतुल्य यांनी 'प्रेपइंस्टा' हे नाव ठरवले. या नावासाठीचे डोमेन त्यांनी केवळ ९९ रुपयांत विकत घेतले. २०१९ मध्ये नोएडा येथे कंपनीची औपचारिक सुरुवात झाली. या छोट्याशा गुंतवणुकीने केवळ कंपनीचे नाव बदलले नाही, तर त्यांच्या भाग्यालाच मोठी उडी दिली. आज प्रेपइंस्टा ही विद्यार्थ्यांच्या नोकरी तयारीसाठी ओळखली जाते.



कंपनी स्थापन झाल्यावर पहिले एक–दोन महिने त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मोफत सेवा पुरवली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विश्वास निर्माण झाला आणि ब्रँडची मोफत जाहिरात झाली. नंतर सवलती आणि आकर्षक पॅकेजेस देऊन ग्राहक संख्या वाढवली. प्राइम पॅकेजमध्ये २०० हून अधिक कोर्सेस समाविष्ट आहेत. या धोरणाने कंपनीला वेगवान वाढ मिळाली. केवळ मेहनत आणि समर्पणातून कंपनीने पाच वर्षांत वार्षिक उलाढाल आठ कोटींपर्यंत नेली. सुरुवातीच्या ४५ लाखांच्या कमाईपासून ते आजच्या आठ कोटींपर्यंतचा प्रवास हा अथक प्रयत्नांचा परिणाम आहे. वेबसाइटवर दररोज २० लाखांहून अधिक विद्यार्थी भेट देतात. यातील तीन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी कंपनीच्या सेवांसाठी सभासदत्व घेतले आहे. प्रेपइंस्टा केवळ पैशासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांना नोकरीच्या तयारीत मदत करण्यासाठी निर्माण झाली. कंपनीमुळे हजारो तरुणांना योग्य मार्गदर्शन मिळाले. तीन मित्रांच्या टीमवर्कने दाखवून दिले, की 'तीन तिगाडा काम बिघाडा' ही म्हण खोटी ठरवता येते. त्यांनी एकत्र येऊन करोडोंचे साम्राज्य उभे केले.


अतुल्य कौशिक यांची ही यशोगाथा सांगते, की मोठ्या गुंतवणुकीची गरज नाही. फक्त दृष्टिकोन आणि मेहनत पुरेशी आहे. ९९ रुपयांत सुरू झालेल्या व्यवसायाने आज आठ कोटींची उलाढाल केली. समस्या ओळखा, मित्रांसोबत टीम बनवा आणि सातत्याने प्रयत्न करा, हे या कहाणीतून शिकायला मिळते. प्रेपइंस्टा आजही विद्यार्थ्यांसाठी नोकरीची तयारी सोपी करत असून पुढील वर्षांत व्यवसाय आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| मिल जाता है दो पल का सुकुन चंद यारों की बंदगी में, वरना परेशां कौन नहीं अपनी अपनी जिंदगी में। | न बोलूं न लिखूं तो ये मत समझना कि भूल गए हम, खामोशियों ने भी कुछ जिम्मेदारी ले रखी है। | किसी की सलाह से रास्ते जरूर मिलते हैं। पर मंजिल तो खुद की मेहनतसेही मिलती है। |

अॅप वर्ल्ड

## व्हॉट्सअॅप हॅकरपासून वाचवायचेय?



आजकाल व्हॉट्सअॅप फक्त चॅटिंगसाठी राहिले नाही. ऑफिसच्या कामापासून, फोटो–व्हिडिओ शेअरिंग, फॅमिली ग्रुप्स, बँकिंग डिटेल्स ते महत्त्वाच्या फाइल्सपर्यंत सर्व काही याच्यावर चालते; पण यामुळे एक मोठा धोका निर्माण झाला आहे. एखाद्या हॅकरने तुमच्या फोन नंबरचा अॅक्सेस मिळवला आणि सिम क्लोनिंगसारखी ट्रिक केली तर 'ओटीपी' मिळाल्यावर तो तुमचे खासगी चॅट्स, फोटो, व्हिडीओ आणि संपूर्ण माहिती पाहू शकतो. ही भीती प्रत्येकाला वाटते. यावर सोपा आणि प्रभावी उपाय आहे. व्हॉट्सअॅपचे 'टू–स्टेप व्हेरिफिकेशन'.

हे फीचर चालू केल्यावर तुमच्या अकाऊंट मध्ये सहा अंकी पिन लागते. ओटीपीनंतरही हा पिन टाकल्याशिवाय कोणीही नवीन डिव्हाइसवर व्हॉट्सप उघडू शकत नाही. सिम क्लोनिंग किंवा हॅकिंगच्या बहुतेक पद्धती यामुळे निकामी होतात. तुमचे खासगी जीवन आणि महत्त्वाची माहिती सुरक्षित राहते.

हे कसे सुरू करावे?

* तुमच्या फोनमध्ये व्हॉट्सअॅप उघडा. * अँड्रॉइडमध्ये वरच्या उजव्या कोपऱ्यातील तीन ठिपके टॅप करा. आयफोनमध्ये खालील सेटिंग्ज आयकॉनवर टॅप करा. * सेटिंग्ज अकाउंट टू–स्टेप व्हेरिफिकेशन वर जा.

* चालू करा बटण दाबा.

* ६ अंकी पिन तयार करा. तुम्हाला सहज लक्षात राहील; पण इतरांना अंदाज लावणे कठीण जाईल, असा पिन निवडा.

* पिन पुन्हा टाका आणि सेव्ह करा.

* तुमचा ईमेल पत्ता जोडण्याचा पर्याय येईल. तो जोडला तर पिन विसरल्यास ईमेलद्वारे रिकव्हर करता येईल.




टेक सॅव्ही

तंत्रज्ञानाबद्दलचे गैरसमज हे आपल्या समाजाच्या इतिहासाचा अविभाज्य भाग आहेत. 'एआय'ही त्याला अपवाद नाही. योग्य वापर केला तर 'एआय' शिक्षण अधिक सखोल, अधिक सहकार्यपूर्ण आणि अधिक अर्थपूर्ण बनवू शकतो. अनेक शाळांमध्ये शिक्षक वर्कशीट, प्रश्नपत्रिका आणि धड्यांचे सारांश तयार करण्यासाठी 'एआय'चा वापर करत आहेत, तर विद्यार्थी गृहपाठ सोडवण्यासाठी त्याचा आधार घेत आहेत. या बदलामुळे शिक्षण अधिक सुलभ झाले असले, तरी त्याचबरोबर काही नवे प्रश्नही पुढे आले आहेत. 'एआय'मुळे विद्यार्थ्यांमध्ये 'कॉपी–पेस्ट संस्कृती वाढली आहे. 'एआय'ने दिलेली उत्तरे जशीच्या तशी गृहपाठात लिहून देणे, प्रोजेक्ट्स तयार करणे किंवा निबंध लिहिणे या बाबी सर्वसामान्य झाल्या आहेत. अनुभवाधारित, निरीक्षणाधारित आणि स्थानिक संदर्भातील प्रश्न विचारल्यास 'एआय'चा वापर आपोआप मर्यादित होतो. मुलांना प्रत्यक्ष हाताळण्यासारखी कामे, घरच्या घरी निरीक्षण करून निष्कर्ष काढण्यासारखे प्रोजेक्ट्स, स्थानिक समस्यांवर आधारित अभ्यास, या सर्व गोष्टी 'एआय'ला करता येत नाहीत.

एखादी संकल्पना मुलांना समजली आहे की नाही हे ते न बोलताही शिक्षकांना कळते. ही मानवी जाण 'एआय' कधीच घेऊ शकत नाही. 'एआय' उत्तम चित्र काढू शकतो; परंतु त्या चित्रात चित्रकाराचा अनुभव, भावना, चुका, दुरुस्त्या आणि त्या प्रक्रियेतून मिळणारा आनंद नसतो. एखादा प्रोजेक्ट पूर्ण केल्यानंतर त्यातील चुका ओळखून, त्या दुरुस्त करून, पुन्हा विचार करून मिळणारा आनंद ही प्रक्रिया 'एआय' कधीच देऊ शकत नाही.

अनेक शाळांमध्ये 'एआय'चा वापर आता दैनंदिन वास्तव बनला आहे.


काही शाळांमध्ये तर सकाळच्या प्रार्थनेनंतर 'आजचा एआय तथ्य' असे छोटे सत्रही घेतले जाते. 'एआय'चा सर्वांत मोठा फायदा म्हणजे शिक्षकांचा वेळ वाचतो. एखाद्या शिक्षकाला पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी गणिताची वर्कशीट तयार करायची असेल, तर एआय काही सेकंदांत दहा प्रश्न तयार करून देतो.

विद्यार्थ्यांनी 'एआय'चा वापर गृहपाठ कॉपी करण्यासाठी नव्हे, तर समजून घेण्यासाठी करावा. 'एआय' गणितातील अवघड उदाहरणे टप्प्यांनुसार समजावून सांगू शकतो. विज्ञानातील संकल्पना सोप्या भाषेत स्पष्ट करू शकतो. इंग्रजी निबंधासाठी कल्पना देऊ शकतो. तथापि 'एआय'ने दिलेले उत्तर जसेच्या तसे वहीत लिहिणे हे शिकणे नाही. ते फक्त नक्कल करणे आहे.

समूहकार्य म्हणजे मतभेदांचे व्यवस्थापन, संवाद आणि निर्णयक्षमता विकसित करण्याची प्रक्रिया. 'एआय' कल्पना देतो, भाषिक अडथळे दूर करतो आणि संशोधन सुलभ करतो; परंतु अंतिम निर्णय विद्यार्थ्यांनीच घ्यायचा असतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भाषेची अडचण असते. 'एआय' इंग्रजी मजकूर मराठीत भाषांतर करू शकतो, अवघड शब्दांचे सोपे अर्थ देऊ शकतो आणि मजकूर मोठ्याने वाचून दाखवू शकतो.

टेक्नो टॉक

## जी–मेलच्या नव्या फीचरची मोठी सुविधा




'गूगल'ने जीमेलसाठी एक मोठी घोषणा केली आहे. आता अँड्रॉईड आणि आयओएस दोन्ही वापरकर्त्यांना जीमेलमध्ये एंड–टू –एंड एन्क्रिप्शनची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे संवेदनशील ईमेल पाठवणे आणि वाचणे आता खूप सोपे आणि सुरक्षित झाले आहे.

यापूर्वी एन्क्रिप्टेड ईमेल पाठवायचे झाले तर डेस्कटॉप वापरावे लागे किंवा वेगळे सॉफ्टवेअर किंवा एक्स्टेन्शनची गरज भासे; पण आता एका क्लिकवर सर्व काम मोबाइलच्या जीमेल अॅपमध्ये होईल. व्हॉट्सअॅप आणि टेलिग्राममध्ये संदेश फक्त पाठवणारा आणि ज्याला पाठवत आहे यांनाच दिसतात तसेच आता जीमेलमध्येही होईल. गूगलसुद्धा तुमचा ईमेल वाचू शकणार नाही

सोप्या भाषेत सांगायचे तर तुम्ही सोने–चांदी भरलेला बॉक्स पाठवता. तो बॉक्स कुलूप लावून बंद केला जातो. फक्त ज्याला पाठवला आहे त्याच्याकडे चावी असते. इतर कोणीही तो उघडू शकत नाहीत्याचप्रमाणे पाठवणारा आणि ज्याला पाठवले आहे, यांच्याव्यतिरिक्त कुणालाही ईमेलचे रहस्य कळणार नाही.

ही सुविधा सध्या गूगल वर्कस्पेसच्या एंटरप्राईज वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहे. क्लाएंट साईड एन्क्रिप्शनची परवानगी असलेल्यांना ही सुरक्षा मिळेल. वापर करण्यापूर्वी अॅडमिनला अँड्रॉइड आणि आयओएस सपोर्ट सक्रिय करावा लागेल. एकदा सुरू झाले की जीमेल अॅपमध्ये लॉक आयकॉन दिसेल आणि तुम्ही थेट एन्क्रिप्टेड ईमेल तयार करू शकता, पाठवू शकता आणि वाचू शकता. 'गूगल'ने सांगितले आहे, की यामुळे व्यवसाय आणि संस्थांना त्यांच्या महत्वाच्या डेटाची पूर्ण सुरक्षा मिळेल. मोबाइलवर काम करणाऱ्या लाखो लोकांसाठी ही खूप मोठी सुविधा आहे.



# निसर्गाचे अभ्यासक व्हा

करीअर ग्रोथ


तुम्हाला निसर्गाप्रती प्रेम असेल, जंगलं, प्राणी, पक्षी, किटक यांमध्ये रमायला आवडत असेल तर निसर्गतज्ज्ञ म्हणून काम करता येईल. ऑफबीट अशा या करीअरमध्ये आज असंख्य संधी आहेत. निसर्गाकडे अनेकांचा कल वाढतो आहे. निसर्ग संवर्धनाची जाणीव होते आहे. अशा परिस्थितीत निसर्गतज्ज्ञ लोकांना मार्गदर्शन करू शकतात.

आपल्या देशात अनेक अभयारण्यं आणि राष्ट्रीय उद्यानं आहेत. इथे गेल्यावर प्राणी, पक्षी दुरून बघण्यापेक्षा त्यांची योग्य ती माहिती मिळाली तर भटकंतीचा अनुभव अनेक अर्थांनी समृद्ध होत जातो. जंगलांमधल्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. सर्वसामान्यांना ती दृष्टी नसते. एखाद्या पक्ष्याचा आवाज काहीतरी संदेश देत असतो. हरणांचं ओरडणं ही वाघ येत असल्याची वर्दी असू शकते. निसर्गतज्ज्ञांना या सर्वांचं ज्ञान असतं.

राष्ट्रीय उद्यानांमध्ये येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्याचं काम निसर्गतज्ज्ञ करतात. वन विभागाशी सहकार्य करून गाईड्सना प्रशिक्षण देण्याचं कामही ते करतात. जंगलात सर्वेक्षण करतानाही यांची मदत घेतली जाते. शास्त्रज्ञांनाही त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ होतो. बायोसायन्स किंवा पर्यावरण व्यवस्थापनासारख्या विषयांमध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्ही या क्षेत्राकडे वळू शकता. नोकरी करण्यासोबतच तुम्ही स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकता. टूर्स आयोजित करता येतील.

# वित्त आणि लेखाक्षेत्रातील दोन महत्त्वाच्या पदव्या

उच्चशिक्षण




वित्त आणि लेखा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एसीसीए आणि सीएफए या दोन पदव्या जागतिक स्तरावर प्रतिष्ठित मानल्या जातात. वित्त आणि लेखा क्षेत्रात जागतिक स्तरावर करिअर करण्यासाठी एसीसीए आणि सीएफएप्रमाणेच सीएमए (सर्टिफाइड मॅनेजमेंट अकाऊंटंट), यूएस सीपीए (सर्टिफाइड पब्लिक अकाऊंटंट), एफआरएम (फायनॅन्शियल रिस्क मॅनेजर) आणि डिप्लोमा इन आयएफआरएस यासारखे उच्च दर्जाचे कोर्सेस उपलब्ध आहेत. हे सर्व कोर्सेस विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये मोठ्या संधी मिळवून देतात. एसीसीए (असोसिएशन ऑफ चार्टर्ड सर्टिफाईड अकाऊंटंट) ही ब्रिटनची जागतिक संस्था आहे. ही पदवी प्रामुख्याने अकाउंटिंग, ऑडिटिंग, टॅक्सेशन आणि बिझनेस मॅनेजमेंट या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करते. एसीसीएचा अभ्यासक्रम १३ विषयांमध्ये विभागलेला असून तो तीन स्तरांवर (अप्लाईड नॉलेज, अप्लाईड स्किल्स आणि स्ट्रॅटेजिक प्रोफशनल) पूर्ण करावा लागतो. ही पदवी जगभरातील १८० पेक्षा जास्त देशांमध्ये मान्य असून, तिला सार्वजनिक आणि खासगी अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये मोठी मागणी असते. लेखाशास्त्रात प्रावीण्य मिळवून जागतिक स्तरावर काम करायचे आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. यामध्ये व्यवसायाशी संबंधित कायदे, आर्थिक व्यवस्थापन आणि नैतिक मानकांचा अभ्यास शिकवला जातो.

सीएफए (चार्टर्ड फायनॅन्शियल अॅनॅलिस्ट) ही अमेरिकन संस्थेद्वारे दिली जाणारी पदवी आहे, ज्याला वित्त विश्वात 'गोल्ड स्टँडर्ड' मानले जाते. ही पदवी प्रामुख्याने गुंतवणूक विश्लेषण (इन्व्हेस्टमेंट अॅनॅलिसिस), पोर्टफोलिओ मॅनेजमेंट आणि आर्थिक जोखीम व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रित करते. सीएफए अभ्यासक्रम तीन स्तरांच्या कठोर परीक्षांवर आधारित आहे. इन्व्हेस्टमेंट बँकिंग, इक्विटी रिसर्च आणि अॅसेट मॅनेजमेंट क्षेत्रात करिअर करायचे आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी ही पदवी अत्यंत प्रभावी ठरते.

# रात्रीचा अभ्यास फायद्याचा

स्टडी टॉक



अनेकजण वर्षभर स्पर्धा परीक्षांच्या तयारीत असतात. तेव्हा मित्रांनो, रात्री उशिरा अभ्यास केल्याने होणाऱ्या फायद्यांकडे अजिबात दुर्लक्ष करु नका. दिवसाच्या तुलनेत रात्री अभ्यास करण्याचे अनेक फायदे आहेत.

दिवसभरातील फोन कॉल्स, सोशल मीडिया, मित्र आणि कौटुंबिक गोष्टी अभ्यासात व्यत्यय आणू शकतात. मात्र रात्री हे विचलित होणे टाळता येते. यामुळे एकाग्रता साधते आणि अभ्यास चांगला होतो. तुम्ही स्वतःच्या गतीने आणि आपल्या पद्धतीने अभ्यास करु शकता. स्वनियंत्रण आणि वेळेच्या व्यवस्थापनासाठीही हे उपयुक्त आहे.

**एकाग्रता वाढते**

अलिकडे शांत वातावरण सहसा रात्रीच अनुभवायला मिळते. रात्री रहदारीचा आवाज वा अन्य अडथळे नसतात. कमी आवाजामुळे मन एकाग्र होते. लक्ष केंद्रित होणे शक्य होते. कोणतीही संकल्पना सखोलपणे समजून घेण्यास याची मदत करते.

**मेंदू अधिक सक्रिय**

रात्री मेंदू अधिक सक्रिय होतो. सर्जनशील आणि गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्यासाठी हा सर्वोत्तम काळ आहे. रात्री अभ्यास केल्याने अवघड संकल्पना पटकन समजून घेण्याची आणि लक्षात ठेवण्याची क्षमता वाढते. रात्रीची वेळ क्रिएटिव्ह थिंकिंगला उत्तेजन देते. अशा वेळी नवीन कल्पना सुचतात आणि अभ्यासाच्या नवीन पद्धतींचा अवलंब करण्यास मदत होऊ शकते.

रात्री दिवसभराच्या ताणाचा निचरा होऊन मन शांत झालेले असते. मनःस्थितीची साथ मिळते. याचाही फायदा करुन घेता येतो. त्यामुळे गुंतागुंतीच्या विषयासाठी, आकलनासाठी हा वेळ निवडा. रात्री अभ्यास करताना फोन बाजूला ठेवा. हा नियम आवर्जून पाळा.

# उन्हाळ्यात फिरायला जाताय?

भटकंती

उन्हाळ्यात फिरायला जायचा विचार करत असाल, तर भारतात काही ठिकाणं अशी आहेत जी थंड, सुंदर आणि शांत अनुभव देतात.

**मनाली**

मनाली हे उन्हाळ्यातील सर्वात लोकप्रिय हिल स्टेशन आहे. थंड हवामान, बर्फाच्छादित पर्वत आणि बियास नदीचं सौंदर्य मन मोहून टाकतं.

खास आकर्षण:
*सोलंग व्हॅलीत पॅराग्लायडिंग
*रोहतांग पास
*नदीकिनारी रिलॅक्स वेळ

**ऊटी**


'क्वीन ऑफ हिल्स' म्हणून ओळखलं जाणारं ऊटी खूपच शांत आणि सुंदर आहे.

खास आकर्षण:
*चहाचे मळे
*ऊटी लेकमध्ये बोटिंग
*टॉय ट्रेन राईड

**लडाख**

अॅडव्हेंचर आवडणाऱ्यांसाठी लडाख स्वर्गासारखं आहे.

खास आकर्षण:
*पँगोंग लेक
*नुब्रा व्हॅली



*शांत आणि स्वच्छ वातावरण

**नैनीताल**

नैनीताल 'झीलों का शहर' म्हणून प्रसिद्ध आहे.

खास आकर्षण:
*नैनी लेकमध्ये बोटिंग
*मॉल रोडवर शॉपिंग
*स्नो व्ह्यू पॉइंट

**दार्जिलिंग**

दार्जिलिंग हे थंड हवामान आणि चहाच्या मळ्यांसाठी प्रसिद्ध आहे.

खास आकर्षण:
*कांचनजंगा पर्वत दृश्य
*टायगर हिलवर सूर्योदय
*टॉय ट्रेन राईड

# ...म्हणून हवा पर्सनल ट्रेनर

फिटनेस फंडा

फिटनेस राखणं ही आजच्या धकाधकीच्या काळातली गरज आहे. मात्र हे कळतं पण वळत नाही अशी अनेकांची स्थिती असते. तुमचीही हीच समस्या असेल तर पर्सनल ट्रेनर अपॉईंट करण्याचा निर्णय घ्या. हा थोडा खर्चिक असला तरी खूप फायद्याचा सौदा ठरतो. कसा ते पाहू.

* वर्क आऊट ही एक कमिटमेंट आहे. पण प्रत्येकाला ती गांभीर्याने पाळता येतेच असं नाही. वर्क आऊट टाळल्यानंतर आपण आपल्यालाच माफ करत राहतो. मात्र पर्सनल ट्रेनर तुम्हाला व्यायाम टाळणं ही चूक असल्याचं प्रकर्षाने दाखवून देतो त्याचबरोबर वर्क आऊट करण्यासाठी पुश करत राहतो. हे मोटिव्हेशन खूप महत्त्वाचं असतं.

* नाही म्हटलं तरी व्यायाम थकवून टाकतो. त्यामुळे व्यायामाचा वेळ कमी करण्याकडे अथवा थकवणारे व्यायाम प्रकार टाळण्याकडे अनेकांचा कल असतो. पण पर्सनल ट्रेनर तुम्हाला अधिक धावण्यासाठी, अधिक पुश अप्स करण्यासाठी, अधिक जड प्लेट्स उचलण्यासाठी, ट्रेडमीलवर अधिक काळ धावण्यासाठी प्रवृत्त करतो. सहाजिकच तुमच्या शरीराला आवश्यक तो आणि आवश्यक तेवढा व्यायाम मिळतो.



* तुम्ही एखाद्या बर्गर जॉईंटवर जाता. मग खाण्याचा मोह आवरत नाही. पण अशा वेळी पर्सनल ट्रेनरचे शब्द कानात घुमतात आणि तुम्ही मोहाचे ते क्षण टाळू शकता. कारण हा फिटनेस तज्ज्ञ केवळ व्यायामाबाबत मार्गदर्शन करत नसतो तर तुमचं समुपदेशनही करत असतो.

* पर्सनल ट्रेनरची वर्क आऊटसाठी तयार करताना बोलण्याची पद्धतही वेगळी असते. '२५ क्रंचेस काढ' असं थेट सांगण्यापेक्षा तो तुम्हाला वेगळ्या भाषेत हीच बाब सांगतो.

* पर्सनल ट्रेनर असेल तर इच्छित फिटनेस लेव्हल गाठण्याची शक्यता ३० टक्क्याने वाढत असल्याचं एका निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. म्हणूनच पर्सनल ट्रेनर घेण्यास मागे–पुढे पाहू नका.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात

**राज्य सफाई कर्मचारी आयोग अध्यक्ष शेरसिंग**





नगर – जिल्ह्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, पुनर्वसन, आरोग्य व सामाजिक सुरक्षेशी संबंधित सर्व प्रश्न तातडीने मार्गी लावावेत. तसेच 'हाताने मैला उचलण्यास प्रतिबंध व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३' ची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांच्यासह सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी व सफाई कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

अध्यक्ष श्री. डागोर म्हणाले की, सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी प्रशासनाने करावी. सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानजनक कामाचे वातावरण उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. त्यांच्या नियमित आरोग्य तपासणी, विमा संरक्षण, पाल्यांच्या शिक्षणासाठी सुविधा तसेच कौशल्य विकासाच्या माध्यमातून पर्यायी रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात यावा. लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार कामगारांच्या वारसांना त्वरित नियुक्त्या देण्यात याव्यात. तसेच सफाई कामगारांना किमान वेतन दरमहा विहित वेळेत मिळेल, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

सफाई कामगार हे नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणारे 'फ्रंटलाइन सैनिक' आहेत. त्यामुळे संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करून त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. पुनर्वसन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून लाभार्थ्यांना शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी व लाभ मिळवून देण्यासाठी तालुकानिहाय विशेष मोहीम राबवावी, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सफाई कामगारांना मोफत सदनिकेचा लाभ व मालकी हक्क मिळवून देण्यासह त्यांच्या हिताच्या बाबींवर अधिक भर देण्यात यावा. तसेच जिल्हास्तरावरील समितीत अनुभवी अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी अध्यक्ष श्री. डागोर यांनी उपस्थित सफाई कामगारांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

# मिरवली पहाड परिसरात दुकानदारावर जीवघेणा हल्ला

## झटापटीत १८ हजारांची रोकड गहाळ, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – नगर शहराजवळील मिरवली पहाड परिसरात एका दुकानदारावर धारदार शस्त्राने आणि लोखंडी रॉडने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत खालीद अब्दुल गफुर शेख (वय ४३, रा. आलमगीर) यांनी ४ मे रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १ मे रोजी सायंकाळी आपल्या दुकानावर असताना ही घटना घडली. संशयित आरोपी शेख शम्स उर्फ सोनु याने फिर्यादीला पाठीमागून घट्ट धरून ठेवले. त्यानंतर शेख अली बागवान याने हातातील धारदार शस्त्राने फिर्यादीच्या डोक्यावर डाव्या बाजूला वार करून गंभीर जखमी केले. याचवेळी शेख मोईन बागवान याने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या कंबरेवर प्रहार केला.

हल्लेखोरांनी 'पुन्हा आमच्या नादी लागला तर जिवे मारू' अशी धमकी देऊन घटनास्थळावरून पळ काढला. या झटापटीत फिर्यादीची १८ हजार रुपयांची रोकड गहाळ झाली असून मोबाईलचेही नुकसान झाले आहे. जखमीवर शहरातील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. पोलिसांनी याप्रकरणी शेख मोईन, शेख अली आणि शेख शम्स यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मोरे हे करीत आहेत.

# घरपोहोच गॅस सिलेंडर न देता ग्राहक भंडारकडून अडवणूक

## जिल्हा पुरवठा विभागाकडे नागरिकांची लेखी निवेदनाद्वारे तक्रार

नगर – शहर सहकारी ग्राहक भांडारच्यावतीने नागरिकांना टोकन देवून त्यांच्या कार्यालयात एचपी कंपनीचे घरगुती गॅस सिलेंडर घेण्यासाठी बोलावले जाते. तेथे तासन्तास रांगेत उभे केले जाते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला यांचे मोठे हाल होत असून, गॅस सिलेंडर नेण्यासाठी भिंगारहून नागरिकांना थेट नगर शहरात यावे लागते. त्यामुळे ग्राहक भांडारला गॅस सिलेंडर घरपोहोच देण्याच्या सुचना द्याव्यात, अशी मागणी भिंगार कॅन्टोमेन्ट बोर्डाचे सदस्य वसंत राठोड यांनी जिल्हा पुरवठा विभागाकडे केली आहे.

राठोड यांनी याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे, नगर शहर सहकारी ग्राहक भांडारच्यावतीने एचपी कंपनीचे गॅस सिलेंडरचे वितरण केले जात आहे. मात्र, हे गॅस सिलेंडर घरपोहोच दिले जात नाही. नागरिकांना गॅस सिलेंडर घेण्यासाठी टोकन सिस्टीमद्वारे त्यांच्या कार्यालयात बोलावले जाते. त्यामुळे भिंगार शहरातील नागरिकांना सिलेंडर घेण्यासाठी नगरला यावे लागते. तेथे गॅस सिलेंडर घेण्यासाठी तासन्तास रांगेत उभे रहावे लागते. यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला यांचे मोठे हाल होत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न यातून निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ग्राहक भांडारला घरपोहोच गॅस सिलेंडर देण्यात यावेत, अशी मागणी राठोड यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर राजेश तनपुरे, सुनील पैठणकर, मच्छिंद्र हजारे, श्रीराम दळवी, दीपक बोरुडे, ज्योत्सना मुंगी, शरद कौसे, रघुनाथ चौधर, शंकर जगधने, मधुकर राहिंज, सचिन भांड, सखाराम आळकुटे, बानू खान, फिरोज आतार, रिया खान, मंगल भुजबळ, स्वप्नील नायकू, दशरथ डहाळे, संगीता बेंद्रे आदींची नावे आहेत.

दरम्यान याबाबत ग्राहक भांडारच्यावतीने सांगण्यात आले की, युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅस पुरवठा कमी झाला होता. आता हळूहळू सुरळीत होत आहे. पण अजुनही पूर्णपणे पूर्वीसारखा पुरवठा होत नाही. आता पूर्वीप्रमाणे घरपोहोच सेवा सुरु केली आहे. आम्ही २९ व ३० एप्रिल रोजी भिंगारला गाडी पाठवली होती. आता पुन्हा दोन दिवसात भिंगारला गाडी पाठवण्यात येणार आहे, असे ग्राहक भंडारच्यावतीने सांगण्यात आले.





जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या २० दिवसांच्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाट प्रसंगी प्रशिक्षकांसह उपस्थित असलेले खेळाडू. शेजारील छायाचित्रात उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते करण्यात आले.

# जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

## खो–खो, कबड्डी, कुस्ती आणि बॅडमिंटनसाठी विशेष शिबिर; दोन टप्प्यात विद्यार्थ्यांना मिळणार मार्गदर्शन

नगर – जिल्ह्यातील क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने २० दिवसांच्या प्राथमिक व अद्ययावत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, संतोष वाबळे, प्रियंका खिंडरे, सोमनाथ गीताराम राऊत, बाणेश्वर क्रीडा मंडळाचे मार्गदर्शक गणेश वारुळे, विश्वंभरा प्रतिष्ठान बुऱ्हाणनगरचे रामेश्वर चिमटे, श्रीराम कुस्ती केंद्राचे मार्गदर्शक सोमनाथ राऊत तसेच कुस्तीपटू सौरभ मराठे आदी उपस्थित होते.

यात खो–खो, बॅडमिंटन, कुस्ती आणि कबड्डी या खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार असून शिबिर दोन टप्प्यात आयोजित करण्यात आले आहे. पहिला टप्पा ४ ते १३ मे तर दुसरा टप्पा १८ ते २७ मे या कालावधीत पार पडणार आहे. जिल्ह्यातील खेळाचा प्रचार व प्रसार वाढवणे, ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना समान संधी देणे आणि गुणवंत खेळाडू घडवणे हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश आहे. या माध्यमातून खेळाडूंच्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा विकास करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या माध्यमातून आयोजित केलेले हे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर जिल्ह्यातील क्रीडा चळवळीला बळकटी देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षणाबरोबरच क्रीडाही तितकीच महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे, मात्र योग्य मार्गदर्शन व सुविधा मिळाल्या नाहीत तर ही प्रतिभा दडपून जाते. हेच लक्षात घेऊन आम्ही हे शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरातून खेळाडूंना केवळ खेळाचे तंत्र नव्हे, तर शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना यांचेही शिक्षण मिळणार आहे. प्रशिक्षकांकडून मिळणारे मार्गदर्शन आत्मसात करून खेळाडूंनी स्वतःची शारीरिक क्षमता वाढवावी आणि उच्च स्तरावर पोहोचण्याचे ध्येय ठेवण्याचे त्यांनी आवाहन केले.

शिबिरामध्ये अनुभवी प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन दिले जात आहे. कुस्ती या खेळासाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढावळे, खो–खो साठी संतोष वाबळे तर बॅडमिंटनसाठी विशाल गर्जे यांनी खेळाडूंना प्रशिक्षण देत क्रीडा क्षेत्रातील संधी, तंत्र आणि फिटनेसबाबत सखोल मार्गदर्शन केले. याशिवाय खेळातील बारकावे शिकवून खेळाडूंना स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

शिबिराच्या ठिकाणांमध्ये विविध क्रीडा केंद्रांचा समावेश करण्यात आला आहे. खो–खोचे प्रशिक्षण बाणेश्वर क्रीडा मंडळ, बुऱ्हाणनगर तसेच आबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर (शेवगाव) येथे होणार आहे. बॅडमिंटन व कबड्डीचे प्रशिक्षण जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे दिले जाणार आहे. तर कुस्तीचे प्रशिक्षण संभाजी राजे कुस्ती केंद्र, सावेडी आणि तालुका क्रीडा संकुल, बुऱ्हाणनगर येथे पार पडणार आहे.


क्र.एन.आर./मकानसं.८०६/भिंगार/२०२६–२७, दि.०९/०४/२०२६

**जाहीर नोटीस**

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) रामदास आनंदा उर्फ आनंदराव त्रिमुखे, वय–७५ वर्षे, २) पारुबाई जगन्नाथ त्रिमुखे,वय–६८ वर्षे, ३) राजेंद्र जगन्नाथ त्रिमुखे, वय–५० वर्षे, ४) विनोद जगन्नाथ त्रिमुखे, वय–४६ वर्षे, ५) सोमनाथ जगन्नाथ त्रिमुखे, वय–३२ वर्षे यांनी घर नं.८०६, सर्व्हे.नं.२११/९२२, भिंगार,अहिल्यानगर छावनी परिषद हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र सिव्हिल एम.ए.क्र.३४४/२०२४, दि.१६/०७/२०२५ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह में. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहिल्यानगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतींवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. ८०६, भिंगार,
क्षेत्रफळ : १३६.०० चौ.फुट

कार्यालय अधिक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी
अहिल्यानगर छावनी परिषद (पल्लवी विजयवंशी)



क्र.एन.आर./मकानसं.८०७/भिंगार/२०२६–२७, दि.०९/०४/२०२६

**जाहीर नोटीस**

या नोटिशीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) रामदास आनंदा उर्फ आनंदराव त्रिमुखे, वय–७५ वर्षे, २) पारुबाई जगन्नाथ त्रिमुखे,वय–६८ वर्षे, ३) राजेंद्र जगन्नाथ त्रिमुखे, वय–५० वर्षे, ४) विनोद जगन्नाथ त्रिमुखे, वय–४६ वर्षे, ५) सोमनाथ जगन्नाथ त्रिमुखे, वय–३२ वर्षे यांनी घर नं.८०७, सर्व्हे.नं.२११/९२३, भिंगार,अहिल्यानगर छावनी परिषद हे कायदेशीर वारस प्रमाणपत्र सिव्हिल एम.ए.क्र.३४४/२०२४, दि.१६/०७/२०२५ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह में. कार्यकारी अधिकारी छावनी परिषद, अहिल्यानगर यांचेकडे तसे लेखी कळवावे. सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतींवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. ८०७, भिंगार,
क्षेत्रफळ : १५०.०० चौ.फुट

कार्यालय अधिक्षक
कृते मुख्य अधिशासी अधिकारी
अहिल्यानगर छावनी परिषद (पल्लवी विजयवंशी)



**जाहीर नोटीस/घोषणापत्र**

अहमदनगर येथील मे. १३ रे सिव्हील जज्ञ साहेब,
सि.डी. (गवई साहेब) यांचे कोर्टात.....
दि. चौ. अर्ज नं. २२१/२०२५

**अर्जदार : श्री. अनिरुद्ध अजित घैसास वगैरे**
**सामनेवाला : कोणीही नाही**

ज्या अर्थी प्रस्तुतचे अर्जदार १) श्री. अनिरुद्ध अजित घैसास, २) सौ. प्राजक्ता शाश्वत गोखले यांनी गीता अजित घैसास व अजित प्रभाकर घैसास यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे. गीता अजित घैसास व अजित प्रभाकर घैसास यांचे दिनांक ०७/०५/२००८ व १८/०८/२०१५ रोजी अहम दनगर येथे निधन झाले आहे. सदर गीता अजित घैसास व अजित प्रभाकर घैसास यांचे वारस या नात्याने वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नाहीत अगर त्यांना वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच मयताचे नावावरील मिळणारे इतर फायदे मिळण्यासाठी वारस प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क व अधिकार नाही असे कोणाचेही म्हणणे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १ महिन्याचे आत म्हणजेच अर्जाची पुढील नेमलेली तारीख १५/०६/२०२६ रोजी या मे. कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या नोटीसीवरुन असेही कळविण्यात येते की, वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारे हरकत न आल्यास सदर अर्जदाराचा पुरावा घेऊन अर्जदारांना वारस प्रमाणपत्र दिले जाईल व मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली असे.

दि.०४/०५/२०२६

तयार करणार
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
अ.नगर

शिक्का

हुकूमावरुन
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर,
अ.नगर


# शहर व उपनगरांत पाणीपुरवठा विस्कळीत; ढिसाळ कारभाराविरोधात संताप

नगर – शहर व उपनगरांमध्ये गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक व नागरिकांच्या वतीने महानगरपालिके चे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक निखिल वारे, नगरसेवक महेश लोंढे, अभिजीत बोरुडे, रोहन फडतरे आदीसह नागरिकांनी केली.



विस्कळीत पाणीपुरठ्याबाबत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांना नागरिकांच्यावतीने निवेदन देताना नगरसेवक निखिल वारे, नगरसेवक महेश लोंढे, अभिजीत बोरुडे, रोहन फडतरे आदी. (छायाचित्र : लहू दळवी)

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे, या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची गरज वाढलेली असताना, वीज वितरणातील अडचणी, भारनियमन तसेच नियोजनाच्या अभावामुळे शहरात वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी नागरिकांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी इतर ठिकाणी भटकंती करावी लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

नागरिकांनी पाणीपुरवठ्याबाबत माहिती घेण्यासाठी संबंधित वॉलमनशी संपर्क साधला असता, त्यांच्याकडून उडवाउडवीची व उध्दट उत्तरे दिली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. तसेच पाणीपुरवठ्याची नोंद ठेवण्यासाठी आवश्यक असलेली डायरी व्यवस्थित न भरणे, नागरिकांच्या स्वाक्षऱ्या न घेणे अशा प्रकारच्या बेजबाबदार वर्तणुकीमुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याचा फटका प्रभागातील लोकप्रतिनिधींनाही बसत असून त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील विस्कळीत झालेला पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, वॉलमनच्या बेजबाबदार वर्तणुकीवर कठोर कारवाई करावी तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख, प्रभाग अधिकारी, हेड वॉलमन व संबंधित कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक आयोजित करून ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी नगरसेवकांनी केली आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत १) बाळकृष्ण बाजीराव पठारे २) बबन बाजीराव पठारे ३) भाऊसाहेब बाजीराव पठारे ४) श्रीमती देऊबाई बाजीराव पठारे सर्व रा. वाघुडे ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे मालकी वहिवाटीची होती. सदर मिळकत त्यांनी आमचे अशिलाचे पूर्वहक्कदार कै. विरेंद्र मोतीलाल लोढा यांना खरेदी देण्याचे ठरवून त्यांचेकडून मोठ्या रकमेचा विसार घेऊन त्यांचेलाभात साठेखताचा दस्त करून दिला होता. मात्र त्यानंतर त्यांनी सदर साठेखताच्या अटी व शर्तीची पूर्तता करून कै. विरेंद्र मोतीलाल लोढा यांचे लाभात मिळकतीचे खरेदीखत करून देण्याचे कामी टाळाटाळ केल्यामुळे कै. विरेंद्र मोतीलाल लोढा यांनी त्यांचे विरूद्ध नगर कोर्टात स्पे. मु. नं. ३७/२०१४ चा दावा सदर मिळकतीचे खरेदीखत करून मिळण्याकरीता व इतर बाबी मिळण्याकरिता दाखल केला होता. सदर दावा प्रलंबित असताना विरेंद्र मोतीलाल लोढा मयत झाल्यामुळे त्यांचे वारसांनी म्हणजे आमचे अशिलांनी सदर दावा पुढे चालविला. पुढे पुराव्याअंती सदर दाव्याचा निकाल होऊन मा. न्यायालयाने दावा मंजूर केला व सदर बाळकृष्ण बाजीराव पठारे वगैरे यांनी आमचे अशिल म्हणजे दाव्यातील वादी १) श्रीमती स्मिता विरेंद्र लोढा २) श्री.मोनेश विरेंद्र लोढा ३) सौ. निकिता सिध्दार्थ लुणावत यांचे लाभात खरेदीखत करून देऊन सदर मिळकतीचा मालकी हक्काने प्रत्यक्ष ताबा देण्याचा आदेश केला. मात्र सदर बाळकृष्ण पठारे वगैरे यांनी मा. न्यायालयाचे आदेशाचे पालन न करता सदर निर्णयाविरूद्ध मा. उच्च न्यायालय औरंगाबाद बेंच यांचेपुढे पहिले अपिल दाखल केले असून त्याचे कामकाज प्रलंबित आहे. सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना सदर बबन बाजीराव पठारे व भाऊसाहेब बाजीराव पठारे यांनी १) श्री. भिमाजी बाबूराव गंधाडे २) श्री. वसंत पाटीलबा किंकर यांचे लाभात सदर मिळकतीपैकी त्यांचे हिश्याचे जमिनीचे बेकायदेशीररित्या खरेदीखत करून दिले. आता श्री भिमाजी बाबुराव गंधाडे व वसंत पाटीलबा किंकर हे सदर मिळकतीपैकी त्यांनी तथाकथितरित्या खरेदी केलेल्या भागाची विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलाचे निदर्शनास आले आहे. तसे झाल्यास खरेदीदारांना सदर मिळकतीमध्ये कोणतेही कायदेशीर हक्क व अधिकार प्राप्त होऊ शकणार नाहीत. तरी सदर मिळकतीबाबत १) भिमाजी बाबुराव गंधाडे २) वसंत पाटीलबा किंकर यांचे बरोबर कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. केल्यास तो सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलाचे हक्क हितसंबंधावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी कळावे.

**मिळकतीचे वर्णन– (परिशिष्ट)** : डी।। अहमदनगर सब डी ।। तालुका पारनेर पैकी जिल्हा परिषद अहमदनगर व तालुका पंचायत समिती पारनेर यांचे हद्दीतील मौजे वाघुडे बु ।। येथील शेतजमीन मिळकती.

| | गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|---|
| अ) | २६३/१/१ | १.४३ | २ रु.४५ पै. |
| ब) | २६३/१/२ | १.४२ | २ रु.४५ पै. |
| क) | २६३/१/३ | ०.२० | २ रु.४५ पै. |

यासी एकत्रीत चतुःसीमा
पूर्वेला– गट नं. ५६३/१/३, २६३/१/५ व २६३/१/३ पैकी
दक्षिणेस– रस्ता व याच गट नं. पैकी राहिलेली जमीन
पश्चिमेस– गट नं. २२९, उत्तरेस– नगर–पुणे रस्ता

ता.०५/०५/२०२६
अहिल्यानगर

**ॲड. सिध्देश पी. मेहेर.**
४, गोवर्धन अपार्टमेट, अहिल्यानगर


# नगरमध्ये १० ते २५ मे दरम्यान विद्यार्थ्यांसाठी 'समर कॅम्प २०२६'

नगर – डान्स युनिव्हर्स इन्स्टिट्यूट व कराळे क्लब यांच्या वतीने 'समर कॅम्प २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. हा कॅम्प १० ते २५ मे या कालावधीत कराळे क्लब हाऊस, न्यू लिंक रोड, सावेडी बसस्थानकाजवळ येथे होणार आहे.यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांतील उपक्रमांचा समावेश करण्यात आला असून शारीरिक, मानसिक, सामाजिक व सर्जनशील विकासावर विशेष भर देण्यात आला आहे.

'फिटनेस झोन' अंतर्गत डान्स फिटनेस, झुंबा, स्ट्रेंथ ॲण्ड फ्लेक्सिबिलिटी ट्रेनिंग, मजेदार वर्कआउट चॅलेंजेस, ब्रेन जिम तसेच योग, ध्यान व रिलॅक्सेशन यांचा समावेश आहे.

'सोशल ॲण्ड लाईफ स्किल्स झोन'मध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपक्रम, सार्वजनिक वक्तृत्व व स्टोरीटेलिंग, टीम बिल्डिंग, सोशल मीडिया अवेअरनेस, मनी मॅनेजमेंट बेसिक्स आणि शिस्त व एकाग्रता वाढविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

तसेच 'आर्ट ॲण्ड क्रिएटिव्ह झोन'मध्ये ड्रॉइंग, पेंटिंग, पेपर क्राफ्ट, मोजॅक आर्ट, टाय ॲण्ड डाय, फॅशन डिझाईनिंग, स्क्रॅपबुक आणि विविध सर्जनशील प्रकल्पांचा समावेश आहे. 'गेम्स ॲण्ड ॲडव्हेंचर झोन'मध्ये इनडोअर–आउटडोअर खेळ, ॲडव्हेंचर डे, निसर्गभ्रमंती तसेच पूल पार्टी व अक्वा डान्ससारखे आकर्षक उपक्रम ठेवण्यात आले आहेत. याशिवाय 'फन ॲण्ड एंटरटेनमेंट झोन'मध्ये रील मेकिंग वर्कशॉप, अभिनय व अभिव्यक्ती खेळ, टॅलेंट शो, थीम डे ॲक्टिव्हिटीज आणि दररोज वेगवेगळ्या मजेदार स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत.

प्रवेश प्रक्रिया सुरू असून पालक व विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी सागर अलचेट्टी (मो. ९६३७१३९५५२) व कुणाल सुर्यवंशी (मो. ९३५९०१९२६४) कराळे क्लब (मो. ७३८५२२३४२१)


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ **दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता. ०५/०५/२०२६.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर हद्दीतील **मौजे नालेगांव येथील** खालील वर्णनाची प्लॉट मिळकत – **सर्व्हे नं. ८७/२ मधील प्लॉट नं. १ याचा हिस्सा नं.४ चे एकूण क्षेत्रफळ २४२.४९ चौ.मी. यापैकी पश्चिम बाजूकडील प्लॉट याचे क्षेत्र १२१.२४ चौ.मी. (खरेदीखता प्रमाणे १२१.२४५ चौ.मी.) हा संपुर्ण प्लॉट. यांसी चतुःसिमा :–**

पुर्वेस :– प्लॉट नं.१ पैकी उर्वरित क्षेत्र, दक्षिणेस :– प्लॉटनं.२
पश्चिमेस :– ९.०० मीटर रुंदीचा रस्ता,
उत्तरेस :– ९.०० मीटर रुंदीचा रस्ता

**वर नमूद मिळकतीचे विद्यमान मालक–**
**संगिता शांताराम वाघमारे.**
रा. घर नंबर ४, यशवर्धन रो–हौसिंग कॉलनी,
जाधव पेट्रोलपंपाजवळ, जाधवनगर,
नगर– कल्याण रोड, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९, ९८६०८०५५५९


# जुन्या वादातून तरुणाला लाकडी दांडक्याने मारहाण

नगर – शहरातील टिळक रोड परिसरात जुन्या भांडणाच्या रागातून एका तरुणाला दुचाकीवर नेऊन सहा जणांच्या टोळक्याने लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना ४ मे रोजी दुपारी घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आयुष गुलाब पवार (वय २२, रा. वाकोडी, ता.नगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा आपल्या खासगी कामात व्यस्त असताना आरोपींनी त्याला गाठले. पूर्ववैमनस्यातून युवराज भिंगारदिवे, अभिषेक शेलार आणि त्यांच्यासोबत असलेल्या इतर चार अनोळखी साथीदारांनी आयुषला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून लकडी पुलाच्या परिसरात नेले. तिथे बेकायदेशीर जमाव जमवून आरोपींनी फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

रागाच्या भरात आरोपींनी लाकडी दांडक्याने आयुषला मारहाण केली, ज्यामध्ये तो जखमी झाला आहे. आमच्या नादी लागला तर जिवे मारून टाकीन, अशी धमकी देत आरोपींनी परिसरात दहशत निर्माण केली. या घटनेनंतर घाबरलेल्या पीडित तरुणाने कोतवाली पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेत आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप पितळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

